**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९१८/०२**

**श्री. विनोद चोथानी,** **------ अपीलकर्ता**
**हनुमान मित्र मंडळ, परळ,**
**अंबा चाळ वाडी, जहाँगीर मेरवाजनी पथ,**
**परळ,, मुंबई- ४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक,**
**झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०३४.**

**जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,**
**एम.बी.आर.आर.बी., डी-१, डिव्हीजन,**
**८९-९५, रजनी महल,**
**ताडदेव रोड, मुंबई-४०० ०३४.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. विनोद चोथानी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, एम.बी.आर.आर.बी. डी-१ डिव्हीजन, रजनी महल, ताडदेव रोड, मुंबई यांच्याकडे दि.२४.४.२००७ रोजी अर्ज करुन, १० लाडाभाई मेन्शन, १ ए, न्यू क्वीन्स रोड, मुंबई येथील सहकारी संस्थेच्या इमारतीचे बांधकाम म्हाडाने केले. बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेल्या इमारतीच्या नकाशाची प्रत, बांधकाम परवाना/ ना हरकत प्रमाणपत्र इ.ची प्रत इ.अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता (द.), एम.बी.आर.आर.बी. डी-१ डिव्हीजन, रजनी महल, ताडदेव रोड, मुंबई यांच्याकडे दि.२०.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१८, २०, २१ जुलै, २००७ रोजी सुनावणी घेऊन पुढीलप्रमाणे आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास पहाणी साठी कागदपत्र उपलब्ध करुन दिले. अपिलकाराने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या ८४८ झेरॉक्स प्रती व ०८ नकाशे इ. महालक्ष्मी स्टेशनरी आणि झेरॉक्स सेंटर येथून रु.४२४/-भरुन झेरॉक्स प्रती काढण्यांत आल्या. परंतु अपिलकारास ८४८ फोटोप्रती व ०८ नकाशाच्या प्रती देण्याऐवजी एकूण ६९८ प्रती दिल्या व ०७ नकाशाच्या प्रती दिल्या. अपिलकाराने मागणी केलेल्या १५० प्रती व ०१ नकाशाची प्रत कमी दिली असे अपिलकाराचे म्हणणे

असल्याचे दिसून येते. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता अपिलकार श्री.विनोद चोथानी हजर होते. प्रथम अपिलीय अधिकारी/जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने त्यांच्या १० लाडाभाई मेन्शन, १ ए, न्यू क्वीन्स रोड, मुंबई येथील त्यांच्या संस्थेच्या बांधकाम परवाना/ ना हरकत प्रमाणपत्र व नकाशाच्या प्रतींची मागणी केली होती. प्रथम अपिलीय अधिका-यांनी कागदपत्रांची पहाणी करुन अपिलकाराने मागणी केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्र उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी कागदपत्रांची तपासणी करण्यास अपिलकारास परवानगी दिली. अपिलकाराने तपासणी करुन ८४८ कागद पत्रांच्या साक्षांकित फोटोप्रती तसेच ०८ नकाशांच्या फोटो प्रतींची मागणी केली. त्याप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी महालक्ष्मी स्टेशनरी सेंटरवरुन ८४८ कागदपत्राच्या व नकाशाच्या फोटी प्रती काढल्या. परंतु प्रत्यक्षात अपिलकारास ६९८ फोटोप्रती व ०७ नकाशाच्या फोटोप्रती दिल्या. कागदपत्रांच्या १५० व नकाशाची एक प्रत अपिलकारास दिली नसल्याचे सुनावणीच्यावेळी अपिलकाराने आयोगाच्या निदर्शनास आणले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या सुचनेनुसार जन माहिती अधिका-याने अपिलकारास उर्वरित कागदपत्रांच्या १५० छायाप्रती एक नकाशाची छायाप्रत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९३४/०२**

**श्री. सुनिल मधुकर वाखारकर,** **------ अपीलकर्ता**
**ई-५/बी-००७, हायवे पार्क, ठाकूर संकुल,**
**कांदिवली (पूर्व), मुंबई- ४०० १०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कुलसचिव, मुंबई विद्यापिठ,**
**मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप कुलसचिव, मुंबई विद्यापिठ,**
**मुंबई-४०० ०३२.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सुनिल मधुकर वाखारकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्याकडे दि.१६.७.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" अपिलकाराने दि.५.२.२००७, १७.२.२००७ आणि २६.२.२००७ रोजी जन माहिती अधिका-यांकडे गोपनीय तक्रार अर्जाद्वारे कुलगुरु यांच्याकडे, प्राचार्य, मिठीबाई कला महाविद्यालय, चौहान विज्ञान संस्था व अमृतबेन जीवनलाल वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय, विलेपार्ले (प.), मुंबई यांनी नियमबाहय पध्दतीने अपिलकारास निलंबित केलेल्या कार्यवाहीबाबत " अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. ६.८.२००७ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे माहिती दिली.

(क) अपिलकाराच्या तक्रार अर्जाची प्रत पत्र क्र.CONCOL/GC/३८२, दिनांक १६.१.२००७ व क्र.CONCOL/GC/३७८५, दिनांक २७.७.२००७ अन्वये संबंधित महाविद्यालयास अभिप्रायासाठी पाठविले आहे. (२ प्रती जोडत आहे.)

(ख) संबंधित महाविद्यालयाचे पत्र क्र. SMW/२००६-०७/३२७०, दिनांक १७.२.२००७ अन्वये पाठविलेल्या पत्राची प्रत जोडत आहे. (१ प्रत). तसेच पत्र CONCOL/GC/३७८५, दिनांक २७.७.२००७ महाविद्यालयास अभिप्रायासाठी पाठविले आहे.

(ग) अपिलकाराचा अर्ज व पत्रावर तक्रार निवारण कक्ष कारवाई करीत आहे.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे दि. ८.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-

यांनी दि. २९.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत प्रथम अपिलावर आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.९.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ३०.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, मुंबई विद्यापिठ, श्री. प्र.मा.गोसावी, तसेच अपिलकार श्री.सुनिल वाखारकर हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकार, मिठीबाई कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई येथे वरिष्ठ लिपिक पदावर कार्यरत होते. महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणुकीच्या दिनांकाबाबत काही अनियमितता नजरेस आली. सदर बाब अपिलकारांनी प्राचार्यांच्या निदर्शनास आणली. परंतु संबंधित कर्मचा-यांवर काही कारवाई झाली नाही. अपिलकाराने सदर बाब व्यवस्थापनास लेखी कळविली. यामुळे सूडबुंध्दीने प्राचार्यांनी अपिलकारास दि.२९.४.२००६ पासून निलंबित केले, अशी अपिलकाराची धारणा आहे. अपिलकाराची निलंबनाची कार्यवाही व विभागीय चौकशी मागे घेऊन कामावर रुजू करुन घेण्याबाबत व्यवस्थापनास आदेश द्यावेत अशी अपिलकाराने उप कुलगुरु, मुंबई विद्यापीठ यांना दि.१७.२.२००७ रोजी अर्ज करुन मागणी केली आहे. अपिलकाराविरुध्द विभागीय चौकशी सुरु असल्याचे समजते. त्यामुळे उक्त अधिनियमातील कलम ८ (१) (ज) येथील तरतुदीनुसार अपिलकारास त्यांच्या निलंबन/ विभागीय चौकशी संबंधित माहिती देता येणार नाही.

डॉ.मा.ना.वेलिंग, मिठीबाई महाविद्यालयाचे प्राचार्य असतानासुध्दा एप्रिल, २००६ मध्ये एन.एम.महाविद्यालयात प्राचार्य म्हणून सही करीत होते. याची शहानिशा करण्याकरिता अपिलकाराने मुंबई विद्यापिठाकडे माहिती मागितली होती. महाविद्यालयातील एका प्राचार्यास दोन महाविद्यालयात सहया करण्याचा अधिकार कोणत्या नियम/ आदेशानुसार आहेत याबाबतच्या नियम/ आदेशाची छायाप्रत अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९३७/०२**

**श्री. उमाकांत गणपत जोगी,** **------ अपीलकर्ता**
**पर्यवेक्षक, भाषा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**भाषा संचालक, भाषा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई- ४०० ०५१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक भाषा संचालक, भाषा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई- ४०० ०५१.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. उमाकांत गणपत जोगी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई-५१ यांचे कडे दि. ३०.७.२००७ रोजी अर्ज करुन, भाषा संचालनालयाच्या स्थापनेपासून आतापर्यंत पर्यवेक्षक, सहाय्यक भाषा संचालक पदावर देण्यात आलेल्या पदोन्नत्यांचा सेवा विषयक अभिलेखक व अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई-५१ यांचेकडे दि.१४.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर, प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ३०.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्रीमती स्मिा द. मंत्री, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्रीमती शीतल कसबे तसेच अपिलकार श्री.उमाकांत जोगी हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने भाषा संचालनालयातील पर्यवेक्षक व सहायक भाषा संचालक पदाच्या आतापर्यंतच्या पदोन्नतीसंबंधी अनुषंगिक माहिती मागितली. अपिलकाराने मागितलेली माहिती तयार असल्याचे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे तयार असलेली माहिती द्यावी. अपिलकाराने कार्यालयातून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९२९/०२**

**श्री. हसमुख मथुरदास पोमल,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा- मथुरादास रवीभाई पोमल,**
**जयंत को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**२०/२, जयंत महल, डी.रोड,**
**मरीनलाईन्स, मुंबई- ४०० ०२०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जी.पी.ओ. समोर, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जी.पी.ओ. समोर, मुंबई-४०० ००१.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. हसमुख मथुरदास पोमल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस, फोर्ट, मुंबई यांचेकडे दि.११.५.२००७ रोजी अर्ज करुन पुनरिक्षण अर्ज क्र.१७७/२००७ च्या संदर्भात दि.१६.४.२००७ रोजी निर्णयासाठी बंद केलेल्या प्रकरणाच्या सद्यःस्थितीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली.

" अपिलकाराच्या अर्जातील मुद्दा क्र. "सी "व " टी " ची माहिती दिली. अर्जातील मुद्दा क्र.ए, बी व डी ते एस या मुद्यामध्ये अपिलकाराने प्रश्नार्थक स्वरुपाची माहितीची मागणी केली. माहितीच्या अधिकारांतर्गत अधिनियमामध्ये कागदपत्राच्या प्रती/ आदेश देण्याची तरतूद आहे. त्यामुळे प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती पुरविता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि. २९.५.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. "

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांचेकडे दि.१४.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२५.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. प्रथम

अपिलाच्या सुनावणीच्यावेळी वादी, प्रतिवादीचे म्हणणे ऐकून घेतले. जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक सहकारी संस्था, मुंबई यांनी अपिलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील फेटाळण्यात आल्याबाबत दि.९.७.२००७ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.९.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, श्री.एम.पी.कल्याणकर, जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक सहकारी संस्था, श्री.एस.एस.आमणे तसेच अपिलकाराच्या वतीने कु.मीना पोमल हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अर्जावर जन माहिती अधिका-यांनी दि. २९.५.२००७ च्या पत्रान्वये उपलब्ध माहिती अपिलकारास देवून समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.९.७.२००७ रोजी दिलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९२२/०२**

**प्रो.जे.थेकेदत,** **------ अपीलकर्ता**
**४३, केनेडी ब्रिज,**
**मुंबई- ४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,** **------- उत्तरवादी**
**व्ही.ई.एस.कौलेज, आर्टस, सायन्स आणि कॉमर्स,**
**सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,**
**व्ही.ई.एस.कौलेज, आर्टस, सायन्स आणि कॉमर्स,**
**सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.**

## - वि वे च न -

अपिलकार प्रो. जे. थेकेदत, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई यांचेकडे दि.३.४.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" अर्जातील मुद्दा क्र.१, २ ए, बी अनुसार स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या अनुदानित महाविद्यालयातील बहुतेक शिक्षक/ शिक्षिकांचे पती/ पत्नी बी.ए.आर.सी./आर.सी.एफ. इ.शासकीय संस्थेत कार्यरत आहेत. शासकीय संस्था/ अनुदानित महाविद्यालयात कार्यरत असलेल्या पती/ पत्नी या दोघांपैकी कोणाच्याही एकाच्या नांवे शासकीय निवासस्थान वाटप केलेले असेल अशा पती/ पत्नी अधिकारी/ कर्मचा-यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही. तरीही प्राचार्या, श्रीमती जे.दास यांचेसहित महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षिकांचे पती/पत्नी घरभाडे भत्त्याची मागणी (Claim) करतात. प्राचार्य, उपप्राचार्य अधिक भत्ते घेतात. विद्यार्थ्यांकडून अधिक फी वसूल केली जाते, इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. "

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मुद्देनिहाय माहिती दिली. इतर आवश्यक माहितीकरिता कागदपत्राच्या तपासणीसाठी दि.२२.५.२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता कार्यालयात हजर रहाण्याबाबत अपिलकारास कळवून त्यानंतर मागणीप्रमाणे माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी कळविले.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, यांच्याकडे दि.२८.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२९.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीची नोटीस युपीसीने पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी/जन माहिती अधिकारी हजर नव्हते. अपिलकार प्रो.जे.थेकेदत सुनावणीसाठी हजर होते.

सुनावणीचेवेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

शासन सेवेत/अनुदानित संस्थेत दोघेही पती-पत्नी कार्यरत असल्यास व त्यांच्यापैकी कोणा एकाच्या नांवे शासकीय निवासस्थानाचे वाटप केले असल्यास व पती/पत्नी एकमेकांसोबत रहात असल्यास त्यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही. शासन अनुदानित स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चेंबूर, मुंबई येथील काही शिक्षक/ शिक्षिकांचे पती/ पत्नी, बी.ए.आर.सी./ आर.सी.एफ. या शासकीय संस्थेमध्ये कार्यरत आहेत. त्यापैकी बहुतेक शासकीय संस्थेच्या निवासस्थानात रहातात व घरभाडे भत्त्याचाही लाभ घेतात. याबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली. तसेच प्राचार्य, उप प्राचार्य हे वेतना व्यतिरिक्त अधिकचे भत्ते घेतात, विज्ञान संस्थेच्या विद्यार्थ्यांकडून जर्नलसाठी अधिकची फी आकारण्यात येते, याबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली होती. माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कागदपत्राच्या तपासणीकरिता अपिलकारास कार्यालयात दि.२२.५.२००७ रोजी जन माहिती अधिका-याने बोलाविले होते. अपिलकारास तपासणीसाठी कागदपत्र दिली. परंतु, उक्त अधिनियमातील कलम ८(१) (इ) (एच) (जे) अन्वये माहिती उपलब्ध करुन देण्याचे नाकारले असे दिसते. प्रशासकीय प्रतवारी व महाविद्यालयाच्या मुल्य निर्धाणासाठी तसेच विद्यापिठास महाविद्यालयाकडून सर्व माहिती पुरविली जाते. तेव्हा कलम ८ (१) अन्वये अपिलकारास माहिती नाकारता येत नाही असे अपिलकाराने सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली माहिती गोपनीय स्वरुपाची नसल्याने नाकारता येणार नाही. तरी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास तपासणीचेवेळी मागणी केलेली कागदपत्र उपलब्ध करुन द्यावीत.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००८/७३/०२**

**श्री. इम्रान युनुस आझमी,** **------ तक्रारदार**
**आझमी हाऊस, ४४/ई/८५,**
**फुर्कानिया चौक, कमला रामानगर,**
**गोवंडी, मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिार्माण भवन, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - <u>वि वे च न</u> -

तक्रारदार श्री.इम्रान युनुस आझमी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ (१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे, गैरतक्रारदार मुख्याधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांनी मागितलेली मुद्देनिहाय माहिती दिली नसल्याने दि. ५.१०.२००७ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दि. २५.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार, सह मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, (म्हाडा), श्री. अ.र.काळे तसेच तक्रारदार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच तक्रारीमधील कागदपत्राची तपासणी करण्यात आली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

तक्रारदार श्री.इम्रान आजमी यांानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये गैरतक्रारदार तथा मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, म्हाडा यांचेकडें दि.६.१०.२००६ रोजी अर्ज करुन सर्व्हे क्र, १३८/१ पैकी मौजे मानखुर्द, मुंबई या सर्व्हेमध्ये म्हाडाच्या ताब्यात असलेली १३३९१२ चौ.मीटर क्षेत्रफळाच्या जागेमध्ये प्राथमिक/ माध्यमिक शाळा, महाविद्यालय व इतर शैक्षणिक कार्यासाठी आरक्षित ठेवलेल्या जागेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. गैरतक्रारदार तथा मुख्य अधिकारी यांच्यावतीने कार्यकारी अभियंता, घाटकोपर विभाग, मुंबई मंडळ यांनी दि.२.११.२००६ च्या पत्रान्वये संक्षिप्त स्वरुपात माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, तक्रारदारास मागितलेली माहिती मुद्देनिहाय सविस्तरपणे दिलेली दिसत नाही. तक्रारदाराची सविस्तर मुद्दोहािय माहितीची मागणी आहे. सदर बाब लक्षात घेता या प्रकरणी मी गैरतक्रारदारास असे आदेश देतो की, तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.१०.२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रारीत नमूद मुद्दयाबाबत, मुद्देनिहाय सविस्तर माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत तक्रारदारास माहिती द्यावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिाांक :-०३/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९१५/०२**

**श्री. आबाजी बली चव्हाण,** **------- अपीलकर्ता**
**१२, धाजी माजी पटेल चाळ,**
**खोत कुवा रोड, धनजीवाडी,**
**मालाड (पूर्व.), मुंबई- ४०० ०९७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा,**
**गृहाीर्माण भवा, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुार्वसा प्राधिकरण, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. आबाजी बळी चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे दिनांक १७.४.२००७ रोजी अर्ज करुन, (१) पी.एन./खाजगी/००६/१९९४/०३२५/झो.पु.पा. (२)झोपुपा/ डेप्युटी सी.ई./५४/पी.एन../ए.एल.को.आई २५-९/१९९७, मालाड (पूर्व), धनजीवाडी, मुंबई, एसआरडी/ एसआरएफ योजनेतील आणि महसूल विभागातील गैरव्यवहाराबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यााने अपिलकाराच्या दि. २०.२.२००६ च्या पत्रास आुसरुन पूर्वी मुद्दोहाय माहिती दि.१६.३.२००६ च्या पत्रान्वये दिली. दि.१७.४.२००७ च्या अर्जाबाबत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने दि. १.६.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी यांनी अपिलकारास दि. ७.७.२००७ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे माहिती दिली.

" अपिलकाराच्या माहितीच्या अधिकारातील अर्जावर उपजिल्हाधिकारी कक्षातर्फे पत्र क्र.झोपुप्रा/उजि / शा.मा.अ/कावि-६०२/२००७/६९४, दि.१५.५.२००७ व सहाय्यक निबंधक, झोपुप्रा यांनी पत्र क्र. मुंबई/साी/झोपुप्रा/ शा.मा.अ./११८/सन २००७, दि.१७.५.२००७ अवये अपिलकारास लेखी कळविलेले असल्याा त्यांचे अपील रद्द केले."

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २९.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुाावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, डॉ.बी.एन.बास्टेवाड, प्रथम अविलीय अधिकारी (झोपुप्रा) श्री. वझरकर तसेच अपिलकार श्री.आबाजी चव्हाण हजर होते.

सुनावणीचेवेळी दोही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, धनजीवाडी गृहनिर्माण संस्था मालाड, विकासक श्री.योगेश मेहता, आर्किटैक्ट, श्री. सुभाष चावडा यांनी झोपडपट्टीधारकांचा १४९५ विकास योजनेत दि.११.११.१९९३ रोजी मंजुरी घेतली. दि. २२.२.१९९४ रोंजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र घेतले. भ्रष्टाचार व गैरव्यवहार करुन विक्री केली. याबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा यांनी दि.१५.५.२००७ व दि.१७.५.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, झो.पु.प्रा.यांनी नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले. परंतु अपिलकारास दिलेल्या माहितीची प्रत द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्यावेळी आयोगास जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केली नाही. यावरुन मागितलेली माहिती अपिलकारास दिली असल्याची खात्री होत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर आदेश प्राप्त झाल्या पासून ३० दिवसांचे आंत अपिलकारास माहिती द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०३/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र-२००८/अपील-६६/०२**

**श्री.रवी नामदेव जोशी, ------अपीलार्थी**
**नारळी आग्रीपाडा, १९ वा रस्ता,**
**रामको चाळ, रुम नं.४,**
**खार (प) मुंबई- ४०० ०५२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/ पश्चिम वॉर्ड कार्यालय,**
**अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (इमारत व कारखाने)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/ पश्चिम वॉर्ड कार्यालय,**
**अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०५८** ------उत्तरवादी.

## --- वि वे च न --

अपिलार्थी श्री. रवि जोशी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम ६(१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, अंधेरी यांचेकडे घर नं.जी- ४२, जुहू चचर्रोड, विलेपार्ले येथील बांधकामाबाबत व इतर अनुषंगिक माहिती दि.२०.७.२००६ च्या अर्जान्वये मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार विहित कालावधीत उत्तर दिले नाही. यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झाला आहे. मागितलेली माहिती विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.१८.९.२००६ रोजी अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.९.२००६ रोजी अपिलकाराने दाखल केलेल्या अपिलावर दि.१०.१०.२००६ रोजी सुनावणी घेतली. सुनावणीसाठी श्री.रवि जोशी. श्री.बी.एम. साळवे, सहायक अभियंता तथा जन माहिती अधिकारी हजर होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास १ महिना २० दिवस उशीर केला आहे. यासाठी जन माहिती अधिका-यास दंडित करण्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी

यांनाअधिकार नाहीत. जन माहिती अधिका-याने प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी म्हणजे दि.१०.१०.२००६ रोजी अपिलार्थीस हवी असलेली माहिती दिली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी, जन माहिती अधिका-याने अपिलकारास आवश्यक ती कागदपत्रे, फाईल्स ७ दिवसांचे आत दाखवाव्यात असे दि. १३.१०.२००६ रोजी आदेश पारित केले आहेत.

प्रथम सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिका-यांनी जी माहिती दिली ती समाधानकारक व खरी माहिती दिलेली नाही. त्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.६.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री.आर.एस.ढोले, सहायक अभियंता, प्रथम अपिलीय अधिकारी तथा श्री. धामणे, सहायक महानगरपालिका आयुक्त हे हजर होते.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती देण्यास १ महिना २० दिवस इतका विलंब केला आहे. तसेच जूहू चर्चरोड येथील बांधकामास कलम ३५४-ए अंतर्गत दि.१९.५.२००६ रोजी नोटीस दिली होती. परंतु जन माहिती अधिका-यांनी नोटीस दिली नसल्याचे दि.१०.१०.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास चुकीची माहिती दिली. विलंबाबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी श्री.बा.म.साळवे, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) के/पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई यांना जबाबदार धरलेले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार विलंबाने वा चुकीची माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिका-यांना शास्ती लावण्यापूर्वी त्यांना आपले म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन चुकीची माहिती दिल्याबाबत व विलंबाने माहिती दिल्याबाबत लेखी खुलासा सादर करण्यास जन माहिती अधिका-यांना आयोगाने कळविले होते. जन माहिती अधिका-यांनी दि.१५.७.२००८ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला आहे. तथापि जन माहिती अधिका-यांकडून प्राप्त खुलासा समाधानकारक नाही. माहितीच्या अर्जाची प्रकरणे जन माहिती अधिका-यांनी अधिक काळजीपूर्वक व तातडीने हाताळणे आवश्यक आहे. तसे या प्रकरणी जन माहिती अधिका-यांकडून झालेले नाही.

सबब, माहिती देण्यास झालेल्या विलंबाबत व चुकीची माहिती दिल्याबाबत सहायक अभियंता (इ.व का.) श्री.बा.म.साळवे यांना जबाबदार धरण्यात येत आहे व त्यांच्यावर रु.५०००/- इतकी शास्ती लादण्यांत येत आहे. ही शास्ती श्री.साळवे यांच्या वेतनातून समान पाच हप्त्यात वसूल करण्यांत यावी. नोव्हेंबर, २००८

या महिन्यापासून सदर शास्ती वसूल करण्यांत यावी व शासनाच्या संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करुन याबाबतचा अहवाल आयोगास पाठवावा. सबब, पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जबाबदार सहाय्यक अभियंता (इ.व का.) यांच्यावर रु.५०००/- एवढया रकमेची शास्ती लादण्यांत येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-७.१०.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६१०/०२**

**श्री. अजित शंकरराव महाडिक,** **------ अपीलकर्ता**
**३० (अ), कामगार नगर,**
**कुर्ला (पूर्व), मुंबई-४०० ०२४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (प्रशासन),**
**आयुक्तालय, दुग्ध व्यवसाय,**
**वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.** **------- उत्तरवादी**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. अजित शंकरराव महाडिक, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव, मुंबई यांच्या कडे दि. २६.९.२००६ रोजी अर्ज करुन कार्यालयीन कामासाठी न्यायालयात मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतः हजर असल्याचा पुरावा व तपशील, न्यूझीलंड हॉस्टेल येथे शुटींग करताना दिलेल्या अटी व शर्तीची छायाप्रत, कार्यालयीन कामासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आरे दुग्ध वसाहतीच्या बाहेर गेले असल्यास त्यासंबंधीच्या पुराव्याच्या छायाप्रती, न्यूझीलंड हॉस्टेल येथे केलेल्या विद्युत वायरिंग कामाचा तपशील इ. माहिती मागितली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपिलकारास माहितीपोटी एकूण रु.६०/-इतके शुल्क भरण्याबाबत कळविले.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, दुग्ध व्यवसाय, वरळी, मुंबई यांचेकडे दि.२.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीच्यावेळी अपिलकार हजर होते. सदर सुनावणीच्यावेळी अपिलकाराने असे प्रतिपादन केले की, जन माहिती अधिका-यांनी मागितलेली माहिती ३० दिवसांच्या आत दिली नसल्याने विनामूल्य माहिती द्यावी. जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांची माहितीपोटी रु.६०/-इतकी शुल्क मागणी अप्रस्तुत असल्याचे अपिलीय

अधिकारी तथा उपायुक्त, प्रशासन यांनी सांगितले. तसेच अपिलकारास सदर माहिती देण्यात यावी असे दि.२३.२.२००७ रोजी आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देऊनही अपिलकारास जन माहिती अधिका-याने मागितलेली माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.६.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने दि.२६.९.२००६ च्या माहितीच्या अर्जान्वये एकूण चार मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. कालावधी उलटून गेल्यानंतर माहितीपोटी एकूण रु.६०/- इतके शुल्क भरण्याबाबत अपिलकारास दि.३०.११.०६ च्या पत्रान्वये कळविले. विलंबाने माहिती देण्यासाठी शुल्काची आकारणी करणे अप्रस्तुत असल्याचे नमूद करुन अपिलकारास विनाशुल्क माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २३.२.२००७ रोजी आदेश पारित केले. परंतु, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आंत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९८०/०२**

**श्री. अब्दुल्ला अन्सारी,** **------ अपीलकर्ता**
**रुम नं.१०५, जिजामाता नगर,**
**तीन डोंगरी, अे-१ बेकरीजवळ,**
**गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०९०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग,**
**महापालिका शालेय इमारत, मिठानगर,**
**गोरेगांव (प.), मुंबई-४०० ०९०.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग,**
**महापालिका शालेय इमारत, मिठानगर,**
**गोरेगांव (प.), मुंबई-४०० ०९०.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. अब्दुल्ला अन्सारी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग, मिठानगर, गोरेगांव, मुंबई, यांचेकडे दि.३१.५.२००७ रोजी अर्ज करुन शहा अब्दुल सलाम यांच्या पत्रावर सुनावणी घेऊन वसाहत अधिकारी, पी/दक्षिण विभाग यांनी समता सहकारी गृहनिर्माण संस्था मिठानगर, गोरंगाव यांना निर्गमित केलेल्या आदेशाची साक्षांकित प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती. सुनावणीवर आदेश पारित करण्यासाठी वसाहत अधिकारी हे सक्षम प्राधिकारी नाहीत. वसाहत अधिकारी यांच्याकडून सुनावणीवरील आदेशाची प्रत निर्गमित झालेली नाही या कारणावरुन अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.३०.६.२००७ च्या पत्रान्वये माहिती नाकारली. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, पी/दक्षिण विभाग यांचेकडे दि.३.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

अपिलकाराने विहित कालावधीत अपील अर्ज न केल्यामुळे अपिलकाराचे प्रथम अपील ग्राहय नाही असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१७.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.८.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.सदर अपिलावर

दि.७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने शहा अब्दुल सलाम यांच्या पत्रावर वसाहत अधिकारी, पी/दक्षिण विभाग यांनी सुनावणी आयोजित करुन निर्गमित केलेल्या आदेशाची प्रत मागितली होती. सुनावणीवर आदेश पारित करण्यासाठी वसाहत अधिकारी हे सक्षम प्राधिकारी नाहीत अशी जन माहिती अधिका-यांनी दि.३०.६.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम १९ (१) अनुसार जन माहिती अधिका-याने माहिती दिलेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आंत प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील करणे आवश्यक आहे. परंतु या प्रकरणी अपिलकाराने दोन महिन्यानंतर म्हणजे दि.३.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावरुन अपिलकाराने विहित कालावधीत प्रथम अपील दाखल केले नाही हे सिध्द होते. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९९०/०२**

**श्री. मोहन अनंत खोत,** **------ अपीलकर्ता**
**५९६/४७, गंगाराम निवास,**
**ना.म.जोशी मार्ग,**
**भायखळा (प.), मुंबई- ४०० ०२७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता (उत्तर),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पनर्रचना मंडळ,**
**मुंबई- ४०० ०१४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, ई विभाग,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पनर्रचना मंडळ,**
**मुंबई- ४०० ०३३.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. मोहन अनंत खोत, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ई विभाग, मु.इ.दु.व पु.मंडळ, मुंबई यांच्याकडे दि.८.६.२००७ रोजी अर्ज करुन ५९२-६०० गंगाराम निवास, ना.म.जोशी मार्ग, भायखळा, मुंबई येथील इमारतीच्या सप्टेंबर,२००४ ते मे,२००५ या कालावधीत म्हाडातर्फे दुरुस्ती केलेल्या कामाची क्रमवार अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि. १९.६.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहिती चुकीची, स्वतःची जबाबदारी झटकून टाकणारे बेमुर्वत विधान करुन माहिती दिली असल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, उत्तर, मु.इ.दु.व पु.मंडळ, मुंबई यांच्याकडे दि.६.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सुनावणीच्यावेळी ५९६/४७ एन.एम.जोशी मार्ग, गंगाराम निवास या इमारतीबाबत सुनावणी करण्यांत आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. सदर इमारतीची दरुस्ती दुस-या टप्प्यामध्ये प्रत्यक्ष केव्हापासून सुरु करण्यात आली व संपविण्यात आली. शेवटच्या टप्प्यामध्ये जर संडास आतमधून दुरुस्ती केली असेल व

त्यामध्ये काही त्रुटी असल्यास किंवा गळती असल्यास सदर त्रुटीचे निराकरण कंत्राटदाराकडून करुन घेण्यात यावे व तसा अहवाल सादर करावा. शेवटच्या टप्प्यामध्ये झालेल्या दुरुस्ती कामाबाबत कुठल्या प्रकारची दुरुस्ती करण्यात आली त्याबद्दलची माहिती, सुधारित प्रशासकीय मान्यता, रक्कम व झालेल्या खर्चास अंतिम देयकास अनुसरुन खर्चाचा तुलनात्मक तक्ता, वास्तुशास्त्रज्ञांना प्रत्यक्ष देण्यात आलेली फी, कंत्राटदारास देण्यात आलेल्या देयकासंबंधीची माहिती, शिल्लक रक्कम, पुढील दुरुस्तीसाठी किती रक्कम लागेल इ. सविस्तर माहिती अपिलकारास देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-याने दि.१२.९.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशाप्रमाणे अपिलकारास विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने ५९६/४७, गंगाराम निवास, ना.म. जोशी मार्ग, भायखळा, मुंबई येथील इमारतीच्या दुरुस्तीसंदर्भात अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दि. १९.६.२००७ रोजी दिलेली माहिती चुकीची असल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-या कडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१२.९.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास एकूण ६ मुद्दयांबाबत आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश दिले आहेत. परंतु सदर आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती ३० दिवसांच्या आंत उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/१०/२०८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९९६/०२**

**श्री. खंडू बंडू कांबळे,** **------ अपीलकर्ता**
**देवनार अग्निशमन केंद्र,**
**देवनार म्युनिसिपल कॉलनी,**
**एच-१, रुम नं. २-३**
**गोवंडी (प.), मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप आयुक्त, (निवडणूक)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका इमारत,**
**६ वा मजला, मुख्यालय,**
**सी.एस.टी.समोर, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रमुख अग्निशमन अधिकारी,**
**मुंबई अग्निशमन दल, ई विभाग, २ रा मजला,**
**भायखळा, मुंबई- ४०० ००८.** **------- उत्तरवादी**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. खंडू बंडू कांबळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अग्निशमन अधिकारी, अग्निशमन दल, ई विभाग, मुंबई, यांचेकडे दिनांक २९.८.२००७ रोजी अर्ज करुन मुंबई अग्निशमन दलातील सहाय्यक केंद्र अधिकारी यांच्या सेवा ज्येष्ठतेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (निवडणूक) बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचेकडे दि.१०.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २२.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

" महापालिकेल्या सध्याच्या धोरणानुसार त्यांच्या मुलावर अन्याय झालेला आहे हे अर्जदार श्री.कांबळे यांचे म्हणणे योग्य वाटत नाही. तसेच, श्री.कांबळे यांनी त्यांच्या मुलाच्या सेवाज्येष्ठतेबाबत केलेली विशिष्ट विनंती माहितीच्या अधिकाराच्या कार्यकक्षेत येत नाही. तरीसुध्दा श्री.कांबळे यांना त्यांच्यावर अन्याय

झाला आहे असे वाटत असल्यास त्यांनी याबाबत उच्च न्यायालयात दाद मागावी असे दि. ३.११.२००७ रोजी आदेश पारित केले. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीचा विचार न करता स्वत:हून वेगळेच विषय सुनावणीमध्ये घेतले. यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ३.११.२००७ रोजी पारित केलेले आदेश चुकीचे असल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, परिपत्रक क्र.सीए/पीईई/५८, दि.१०.८.१९७६ व क्र. सीए/एफजीएन/७८, दि. २३.१२.१९८१ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेने प्रसिध्द केलेली व पात्र ठरलेल्या उमेदवारांची सेवाज्येष्ठता यादी दि. ९.१२.२००५ अन्वेय तयार केली आहे ती नियमानुसार होती. ही सेवाज्येष्ठता यादी न धरता आस्थापना आदेश दि. ८.३.२००७ प्रमाणे कोणत्या आधारे व नियमान्वये सेवाज्येष्ठता यादी तयार करण्यात आली याबाबत अपिलकाराने माहिती मागितली आहे. यावरुन अपिलकाराच्या मुलाचा सेवाज्येष्ठता क्रमांक आस्थापना आदेश दि. ८.३.२००७ अन्वये बदलला असल्याने त्यांच्या मुलावर अन्याय झाल्याची अपिलकाराची धारणा आहे. यापूर्वीही याच विषयावर अपिलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. अपिलकाराच्या मुलाच्या सेवाज्येष्ठतेमध्ये बदल करण्यात आल्याबाबत सविस्तर कारणे देवून अपिलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार अपिलकारास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९७३/०२**

**श्री. सुनिल चंद्रकांत महाडेश्वर, ------ अपीलकर्ता**
**ए-३०२, गौतम को.ऑप.हौ.सोसा.**
**ऋषीवन संकुल, काजूपाडा हिल,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. ------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सुनिल चंद्रकांत महाडेश्वर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकारांनी जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई यांचेकडे दिनांक ५.९.२००७ रोजीच्या अर्जान्वये मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्या कार्यकक्षेतील जुहू मोरागाव विलेपार्ले (प.) येथे खासदार श्री.संजय निरुपम यांच्या खासदार निधीतून सन २००४-०५ या वर्षात केलेल्या शौचालयाच्या बांधकामाविषयी तत्सम माहिती व मोजमाप पुस्तिकेच्या नक्कल प्रतीची मागणी केली होती.

अपिलकाराने मागणी केलेल्या कामाची नोंद केलेली मोजमाप पुस्तिकेचा शोध घेण्याचे काम सुरु आहे. सदर मोजमाप पुस्तिका उपलब्ध झाल्यानंतर त्याच्या नक्कल प्रती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात येतील असे दि.१०.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले. विहित कालावधीत जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी यांच्याकडे दि. ११.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२९.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी संबंधित मोजमाप पुस्तिकेचा शोध घेऊन अपिलकारास मोजमाप पुस्तिकेच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात. अपिलकारास मागितलेली माहिती विनामूल्य लवकर उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले.

जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार आवश्यक ती माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजत करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जुहू मोरागाव विलेपार्ले (प.) येथे शौचालयाच्या बांधकामाचा तपशील मागितला होता. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास प्रत्यक्ष कार्यालयात बोलावून कागदपत्राची तपासणी करण्यास परवानगी दिली. अपिलकाराने कागदपत्रांची तपासणी केली. यामुळे अपिलकाराचे पूर्ण समाधान झाले. या प्रकरणी कोणतीही तक्रार नाही. हे प्रकरण बंद करावे असे अपिलकाराने दि.६.२.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांना लेखी कळविले.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९७५/०२**

**श्री. संजय आनंदा मोरे,, ------ अपीलकर्ता**
**बी.डी.डी.चाळ नं. ६०, रुम नं.१,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**न्यू एक्सेसीयल सिनेमाच्या पाठीमागे,**
**मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मध्य विभाग, वरळी, मुंबई- ४०० ०१८. ------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. संजय आनंदा मोरे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मध्य विभाग, वरळी, मुंबई यांचेकडे दि.४.८.०७ रोजी अर्ज करुन वरळी बी.डी.डी.चाळ विभागामध्ये दि.१ जानेवारी,२००५ ते ३० जून,२००७ पर्यंत विशेष दुरुस्ती मंजूर केलेल्या कामाची यादी मागितली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांचेकडे दि.२६.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दि. ७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने वरळी बी.डी.डी.चाळ विभागामध्ये दि.१ जानेवारी,२००५ ते ३० जून,२००७ पर्यंत विशेष दुरुस्ती मंजूर केलेल्या कामांची यादी

मागितली होती.  जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही.  प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणाी करणे आवश्यक आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी.  अन्यथा उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०७/१०/२००८.**

,

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९७७/०२**

**श्री. इम्रान युनुस आझमी,**
**आझमी हाऊस, ४४/ई/८५,**
**फुर्कानिया चौक, कमला रामन नगर,** **------ अपीलकर्ता**
**गोवंडी, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. इम्रान युनुस आझमी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने माहितीच्या अधिकारात दि.२१.९.२००७ व दि. १.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन मानखुर्द, मुंबई येथील पोलीस बीट क्र.५ ला लागून इमारत क्र.१ ते ४ पर्यंत संक्रमण शिबिराच्या असून, इमारत क्र.१ श्री साई विद्यालय व इमारत क्र.४ मोहिते पाटी विद्यालय तसेच धारावी येथे राजे शिवाजी विद्यालय व सर मनोहर जोशी महाविद्यालय यांना शाळा व महाविद्यालय चालविण्यास जागा दिल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२०.१०.२००७ व दि.३०.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. त्यानुसार म्हाडा हे स्वतंत्र स्वायत्त मंडळ असून, म्हाडा अधिनियमातील तरतूद व शासनाने घालून दिलेले निर्बंध यानुसार कामकाज चालते. शेक्षणिक संस्थेचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर मागणी केलेल्या संक्रमण शिबिरातील गाळे उपलब्ध असल्यास गरज पाहून सन २००३ पूर्वी (१) मोहिते पाटील विद्यालय, मानखुर्द, १७ गाळे, (२) श्री साई विद्यालय, मानखुर्द २४ गाळे, (३) कुलाबा संक्रमण शिबिर येथे ५ गाळे, (४) कर्मवीर भाऊराव पाटील सायन प्रतिक्षा नगर, ७८ गाळे, (५) महात्मा फुले शैक्षणिक संस्था, राजे शिवाजी विद्यालय, धारावी, ६८ गाळे. प्राधिकरणाचा ठराव क्र.१४१/१४ नुसार महात्मा फुले शैक्षणिक संस्थेस १८ गाळे म्हाडाच्या अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर तात्पुरत्या

स्वरुपात देण्यात आले आहेत. वरील शैक्षणिक संस्थेस वितरित केलेले आळे अद्याप पर्यंत मंडळाने काढून घेतलेले नाहीत. कराराचे नुतनीकरण करण्यात आलेले नाही अशी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली.

जन माहिती अधिका-यांनी कोणत्या पत्रात खरी, कोणत्या पत्रात खोटी व अपूर्ण माहिती दिली. याकरिता उक्त अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल न करता अपिलकाराने थेट राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता सहाय्यक माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन शेक्षणिक संस्थांना मंडळाने संक्रमण शिबिरातील गाळे वाटप केलेली माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.१०.२००७ व दि. ३०.१०.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. अध्यक्ष, आजमी चॅरिटेबल ट्रस्ट संचालित बाळ विकास हायस्कूल अॅन्ड ज्युनियर कॉलेज, बी.एम.जी.पी.कॉलनी, मानखुर्द यांना दि. ६.१.२००७ च्या पत्रान्वये संक्रमण शिबिराचे शैक्षणिक संस्थांना मंडळाच्या ठरावानुसार वाटप केलेल्या गाळयाबाबत माहिती दिली. मंडळाच्या ठरावानुसार मोहिते पाटील विद्यालयास २० गाळे वितरित केले. तर जन माहिती अधिकारी यांनी दि.२०.१०.२००७ व दि.३०.१.२००७ च्या पत्रानुसार दिलेल्या माहितीनुसार १७ गाळे वितरित केल्याची माहिती दिली. यावरुन मोहिते पाटील विद्यालयास वितरित केलेल्या गाळयाच्या संख्येमध्ये तफावत आढळून येते. सदर माहिती जन माहिती अधिका-यांनीच दिलेली आहे. सदर तफावत का आढळून येते याबाबत पुन्हा कार्यालयातील अभिलेख्यावरुन तपासणी करुन हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आंत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती द्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९७७/०२**

**श्री. प्रकाश रामकृष्ण लोलेकर,** **------ अपीलकर्ता**
**अे/ जी/३, लक्ष्मीनारायण को.ऑप.हौ.सोसा.लि.**
**नारायण म्हात्रे मार्ग, म्हात्रेवाडी,**
**दहिसर (प.), मुंबई- ४०० ०६८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**६९, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**आर वॉड सहकारी संस्था, मल्होत्रा हाऊस,**
**जी.पी.ओ.समोर, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. प्रकाश रामकृष्ण लोलेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने माहितीच्या अधिकारात दि.१२.२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, आर वॉर्ड, मल्होत्रा हाऊस, मुंबई यांचेकडे अर्ज करुन, लक्ष्मी नारायण सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये प्रशासकाकडून चालत असलेल्या कारभाराविषयी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.३.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.२१.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ५.४.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

" अपिलकाराने माहितीच्या अधिकारात मागणी केलेला मुद्दा क्र.१, २ व ४ ची महिती ही संस्था स्तरावर आहे. तसेच मुद्दा क्र. ३ व ५ बाबतची माहिती ही प्रश्नोत्तर स्वरुपापची असून, ती उपनिबंधक, आर/ विभाग, मुंबई या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. सदरची माहिती ही माहितीचे अधिकारात येत नाही. अपिलकाराने संस्थेकडून आवश्यक असणारी कागदपत्रे मिळण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम व संस्थेच्या मंजूर उपविधीनुसार संस्थेस निर्देश द्यावेत असे नमूद करुन प्रथम अपील फेटाळले. "

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार समाधान झाले नसलयाने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ६.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने लक्ष्मी नाराण सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रशासकाकडून सन २००० ते २००६ पर्यंत उत्पन्न आणि खर्च व जमा, सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती, प्रशासकाच्या कामकाजाबाबत परिपत्रक, शासन निर्णय नियम इ. ची प्रत, संस्थेच्या बँकेत असलेल्या खात्याच्या पासबुक/ बँक स्टेटमेंटची प्रमाणित प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. ८.२.२००६ च्या परिपत्रकान्वये सहकारी संस्थांना शासकीय अनुदान व जिल्हाधिकारी यांनी जमीन दिलेल्या संस्थांना केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये अंतर्भूत केलेले आहे. अपिलकाराची सहकारी गृहनिर्माण संस्था माहितीच्या अधिकारात येत नाही. अशी मुद्देनिहाय माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. ३.३.२००७ च्या पत्रान्वये दिली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १९.४.२००७ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९८४/०२**

**श्री. अरविंद लवू चौगुले,** **------ अपीलकर्ता**
**९९/२९८०, पंतनगर,**
**घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**निबंधक, भागीदारी संस्था यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत, ६ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,**
**निबंधक, भागीदारी संस्था यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत, ६ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. अरविंद लवू चौगुले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, निबंधक, भागीदारी संस्था यांचे कार्यालय, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दिनांक २२.५.२००७ रोजी अर्ज करुन मेसर्स वाडीबंदर कॉटन प्रेस या व्यापारी पेढी संदर्भातील नफा तोटयाचे विभागणीचे संदर्भातील शासनाने कायदे, नियम, आदेश, शासकीय निर्णय, परिपत्रके याचा आधार घेऊन जी कार्यपध्दती निश्चित केलेली आहे त्याची पुराव्यासकट माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने भारतीय भागीदार अधिनियम, १९३२ च्या कलम-४ अन्वये भागीदारी संस्थेची व्याख्या देण्यात आलेली आहे. त्या व्याख्येत ती मूलतत्वांचा समावेश केलेला आहे अशी माहिती दिली. तसेच सदर सर्व तरतुदी पूर्ण केल्या आहेत किंवा नाही हे तपासण्यासाठी भागीदारी पत्रात नफ्यातील हिस्सा नमूद केलेला आहे किंवा नाही हे तपासणे गरजेचे असल्यामुळे संबंधित भागीदारांना भागीदारी पत्रात नफा तोटयाचा हिस्सा निर्देशित करणे आवश्यक आहे. भागीदारी संस्था जे भागीदारी पत्र बनविते त्यामध्ये अनेविध अधिनियमाची तरतूद केलेली असते आणि तो एक भागीदारी पत्राचा भाग आहे. त्यामुळे नफा तोटा याबाबत कोणतेही परिपत्रक किंवा शासन आदेश नाहीत. त्यामुळे मागणी केल्याप्रमाणे पुरावा म्हणून कागदपत्र देता येत नाही अशी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. ३०.६.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली.

भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ चा कायदा म्हणजे निबंधक नसून सदर कायद्यान्वये निबंधकाचे हक्क व कर्तव्य व महाराष्ट्र अधिनियमाप्रमाणे निबंधकांनी आलेल्या अर्जावर अंमलबजावणी करावयाची आहे. त्यामुळे जन माहिती अधिका-याने दिलेली माहिती अर्थहिन, दिशाभूल करणारी, असमाधानकारक व चुकीची दिलेली आहे. निबंधकाचे मूलभूत हक्काचे नावाखाली सदर यंत्रणा कायद्याची अंमलबजावणी करतांना पक्षपात करुन अडथळा निर्माण

करीत आहे. जन माहिती अधिकारी श्री.रा.सु.म्हात्रे यांच्यापेक्षा प्रथम अपिलीय अधिकारी, श्री.चंद्रशेखर किनिंगे यांना कायद्याचे व्यापक ज्ञान व अनुभवन तसेच न्याय दृष्टीकोन असल्यामुळे कार्यालयाच्या चुकीच्या कामकाजाविषयी सत्य माहिती मिळविण्याकरिता अपिललकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. १.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि. ३१.८.२००७ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले.

" अपिलकाराने मागणी केलेली सर्व माहिती जन माहिती अधिका-यांनी दिलेली असल्यामुळे अपिलकाराचे अपील फेटाळण्यांत येत आहे. अपिलकाराने अपील अर्जाचे समर्थनार्थ दिलेल्या समस्यांचे निराकरण करुन घेण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणेकडे स्वतंत्र अर्ज करावा."

निबंधकांना नफा तोटा तपासण्याचे कोणतेही घटनात्मक अधिकार नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी " नफा तोटा तपासणी गरजेचे " ही दिलेली माहिती चुकीची असल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मेसर्स वाडीबंदर कॉटन प्रेस या व्यापारी पेढी संदर्भातील अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.३०.६.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. सदर माहिती चुकीची दिली असे अपिलकाराचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांनी भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ चा आधार घेऊन अपिलकारास माहिती दिली. पुरविलेल्या माहितीवरुन वस्तुस्थिती अपिलकाराला माहीत झालीच आहे. अपिलकारास शासकीय माहिती अधिका-याचा निष्कर्ष चुकीचा वाटत असेल तर, समस्यांचे निराकरण करुन घेण्यासाठी अंमजबजावणी यंत्रणेकडे जाण्याचा मार्ग अपिलकाराला उपलब्ध आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ३१.८.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्कयता वाटत नाही.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई/दिनांक :-०८/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९८७/०२**

**श्री. जगदीश देवराम टोरपे,** **------ अपीलकर्ता**
**२५-अे, टोरपे हाऊस, पहिला मजला,**
**फ्लॅट क्र.२, तेजपाल स्कीम, ५ वा रस्ता,**
**विलेपार्ले (पूर्व), मुंबई- ४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे,**
**के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे,**
**के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. जगदीश देवराम टोरपे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई यांच्याकडे दिनांक २९.८.२००६ रोजी अर्ज करुन युनायटेड इंकस अॅन्ड वॉरनिश कं.प्रा.लि.सुभाष रोड, ५ वा रस्ता, विलेपार्ले (पूर्व), मुंबई या प्लॉटवर सनटेक सतगुरु कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रा.लि. या कंपनीने बांधकामासाठी भूगर्भात सुमारे १० ते १५ मीटर व सदरहू भूखंडाच्या पूर्ण पृष्ठभागात केलेल्या खोदकामामुळे टोरपे हाऊसला उद्‌भवणारा धोका, इमारत कोसळणे, प्राणहानी, मालमत्ता हानी,, वित्तहानी होण्याची संभवना आहे. सदरहू खोदकाम धोकादायक असल्याने पालिका इमारत प्रकल्प कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष पहाणी केला आहे का, यासंदर्भात योग्य ते सुरक्षित उपाय योजने आहेत का, याची पूर्ण माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता यांच्याकडे दि.३.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.

०८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता युपीसीने पत्र पाठवूनही जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, सुभाष रोड व तेजपाल स्कीम, ५वा रस्ता, विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथील अपिलकाराच्या टोरपे हाऊसच्या लगतच्या प्लॉटवर सनटेक सतगुरु कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रा.लि. या कंपनीने बांधकामाकरिता खोदकाम सुरु केले. या खोदकामामुळे टोरपे हाऊसला धोका निर्माण झाला असल्याने यासंदर्भात अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. अपिलकाराच्या मालमत्तेचे काही नुकसान झाल्यास दुरुस्ती करुन देण्यांत येईल, तरी बांधकामाकरिता सहकार्य करावे अशी सतगुरु कंपनीने अपिलकारास विनंती केली असल्याचे अपिलातील कागदपत्रांवरुन दिसून येते. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदरहू अधिकारी सुनावणीकरिता हजर नव्हते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसांचे आंत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०४९/०२**

**श्री. वसंत बा.मोरे,** **------ अपीलकर्ता**
**८, पॅरामाऊंट अपार्टमेंट, टिळक रोड,**
**सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई- ४०० ०५४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पश्चिम नियंत्रण कक्ष यांचे कार्यालय,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. वसंत बा.मोरे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पश्चिम नियंत्रण कक्ष, वांद्रे (प.), मुंबई यांचेकडे दि.१७.५.२००७ रोजी अर्ज करुन श्री.जे.के.इब्राहीम उर्फ भाईजान व श्रीकृष्ण उर्फ बाळा चव्हाण यांच्याविरुध्द सांताक्रूझ पोलीस स्टेशनमध्ये नोंदविलेल्या गुन्हयाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

श्रीकृष्ण ऊर्फ बाळा चव्हाण हे सांताक्रूझ पोलीस ठाणेतील अभिलेखावरील राजकीय गुन्हेगार आहेत. पोलीस नियमावली भाग-३, प्रकरण क्र.३, प्रतिबंध कारवाई प्रकरणातील नियम ६३ अन्वये सर्व नोंदवहया सर्वप्रथम दस्तऐवज (प्रिव्हीलेज्ड) असा दर्जा दिला असल्याने ते गोपनीय आहेत. शिवाय सर्व पत्रव्यवहार हा गोपनीय पत्रव्यवहाराप्रमाणे चालतो. म्हणून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ८ (जे) प्रमाणे अपिलकारास माहिती नाकारली. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २१.८.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सांताक्रूझ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील श्री.जे.के.इब्राहीम उर्फ भाईजान व श्रीकृष्ण उर्फ बाळा चव्हाण यांच्याविरुध्द पोलीस ठाणे येथे असलेल्या गुन्हेगारीच्या अभिलेखाची माहिती, गोपनीय असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. जन माहिती अधिका-यांनी घेतलेल्या भूमिकेचे, प्रथम अपिलीय

अधिका-यांनी समर्थन करुन अपिलकाराचे प्रथम अपील दि. ५.९.२००७ रोजी अमान्य केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १६.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, सांताक्रूझ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील श्री.जे.के.इब्राहीम उर्फ भाईजान व श्रीकृष्ण उर्फ बाळा चव्हाण यांच्याविरुध्द पोलीस ठाण्यात असलेल्या गुन्हेगारीच्या अभिलेख्याची माहिती अपिलकाराने मागितली होती. पोलीस नियमावली भाग-३, प्रकरण-३ मधील नियम-६३ अन्वये सर्व नोंदवहया याना सर्व प्रथम दस्तऐवजी (प्रिव्हीलेज्ड) असा दर्जा दिलेला असल्याने ते गोपनीय ठरत असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम-८ (जे) प्रमाणे अपिलकारास माहिती नाकारण्यात आलेली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार अपिलकारास उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७७७/०२**

**श्री. मिलिंद शंकर मुळे,** **------ अपीलकर्ता**
**२८४/१२, बांदेकर सदन,**
**एन.सी.केळकर रोड,**
**दादर (पश्चिम), मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी नॉर्थ वॉर्ड, एम.सी.जी.एम.**
**दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी नॉर्थ वॉर्ड, एम.सी.जी.एम.**
**दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**------- उत्तरवादी**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. मिलिंद शंकर मुळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी नार्थ वॉर्डे, एम.सी.जी.एम.दादर, मुंबई यांच्याकडे दिनांक २१.४.२००७ रोजी अर्ज करुन गणेशपेठ लेन, एन.सी.केळकर मार्ग, दादर, येथील रस्त्याच्या उत्खनाबाबतचे धोरण, मार्गदर्शक तत्वाचे अनुपालनाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती कार्यकारी अभियंता, (एस.ओ.), बृहन्मुंबई महानगरपालिका, डॉ.ई.मोसेस रोड, मुंबई यांच्याशी संबंधित असल्याने अपिलकाराचा अर्ज त्यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यांत आला असल्याचे सहाय्यक अभियंता यांनी दि. २१.५.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर विभाग यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ५.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलकाराने मागितलेली

माहिती १५ दिवसांचे आंत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशान्वये माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, गणेशपेठ लेन, एन.सी.केळकर मार्ग, दादर, येथील रस्त्याच्या उत्खनाबाबतचे धोरण, मार्गदर्शक तत्वाचे अनुपालनाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी, प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देऊनही विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास माहिती द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्म अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०४७/०२**

**श्री. विलास टी.जाधव,** **------ अपीलकर्ता**
**२०६, मुलूंड मयुर गृहनिर्माण संस्था मर्या,**
**भूखंड क्र.७, आर.डी.पी.-१, म्हाडा कॉलनी,**
**मुलूंड (पूर्व), मुंबई- ४०० ०८१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासक,**
**मुलूंड मयुर गृहनिर्माण संस्था मर्या,**
**भूखंड क्र.७, आर.डी.पी.-१, म्हाडा कॉलनी,**
**मुलूंड (पूर्व), मुंबई- ४०० ०८१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विलास टी.जाधव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, मुलुंड मयुर गृहनिर्माण संस्था मर्या. मुलूंड, मुंबई यांच्याकडे दि. १७.९.२००७ रोजी अर्ज करुन, मुलुंड मयुर गृहनिर्माण संस्था मर्या. मुलूंड, मुंबई या संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांच्याकडे दि.१६.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मुलुंड मयुर गृहनिर्माण संस्था मर्या. मुलूंड, मुंबई या संस्थेची एकूण ५ मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा मुलुंड मयुर गृहनिर्माण संस्थेचे प्रशासक, श्री. संजय कोलगे यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दयावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०४८/०२**

**श्री. विलास टी.जाधव,** **------ अपीलकर्ता**
**२०६, मुलूंड मयुर गृहनिर्माण संस्था मर्या,**
**भूखंड क्र.७, आर.डी.पी.-१, म्हाडा कॉलनी,**
**मुलूंड (पूर्व), मुंबई- ४०० ०८१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, २ रा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासक,**
**मुलूंड मयुर गृहनिर्माण संस्था मर्या,**
**भूखंड क्र.७, आर.डी.पी.-१, म्हाडा कॉलनी,**
**मुलूंड (पूर्व), मुंबई- ४०० ०८१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विलास टी.जाधव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, मुलुंड मयुर गृहनिर्माण संस्था मर्या. मुलूंड, मुंबई यांच्याकडे दि. १७.९.२००७ रोजी अर्ज करुन, दिनांक ४ मे, २००७ च्या पत्रानुसार एकूण २८ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्या कडे दि. १६.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १६.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मुलुंड मयुर गृहनिर्माण संस्था मर्या. मुलूंड, मुंबई संस्थेबाबत जन माहिती अधिका-याकडे एकूण २८ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. दोन्ही अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८०६/०२**

**श्री. विकास सुधाकर हरियाण,** **------ अपीलकर्ता**
**लखमा जानू खोत चाळ, न्यू आग्रीपाडा,**
**सांताक्रूझ(पू.), मुंबई-४०० ०५५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप महा समादेशक,**
**होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, जुने सचिवालय,**
**तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग,**
**मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**वरिष्ठ प्रशासनिक अधिकारी (प्रशासन व धोरण),**
**होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, जुने सचिवालय,**
**तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग,**
**मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विकास सुधाकर हरियाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ प्रशासनिक अधिकारी, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दि. ७.५.२००५ रोजी अर्ज करुन क्र.मस/२००५/७०९, दि.८.२.२००५ च्या परिपत्रकामध्ये पद, हुद्दे असा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. संघटनेत मानसेवी पदा व हुद्दे कोणते आहेत याबद्दल असलेली परिपत्रके व अनुषंगिक ०९ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती महाराष्ट्र राज्य होमगार्ड व नागरी संरक्षण मुख्यालयातील आस्थापना, भांडार व लेखा शाखा यांच्याशी संबंधित असल्याने या तिनही शाखांकडून सदरहू माहिती उपलब्ध करुन देण्यास काही कालावधी लागेल. माहिती प्राप्त होताच संकलित करुन अपिलकारास कळविण्यांत येईल असे जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ प्रशासनिक अधिकारी यांनी दि.२० जून, २००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप महा समादेशक यांच्याकडे दि.८.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने मागितलेली माहिती प्राप्त करुन ती संकलित करुन द्यावयाची आहे त्याबाबतची कार्यवाही चालू आहे. कार्यवाही पूर्ण होताच माहिती देण्यांत येईल असे अपिलकारास यापूर्वी दि. २०.९.२००७ च्या पत्रान्वये सूचित करण्यात

आलेले आहे. अर्जातील मुद्दा क्र. ई मधील मागितलेली माहिती स्वतंत्ररित्या कळविण्यांत येत आहे असे वरिष्ठ प्रशासनिक अधिकारी यांनी दि.२१.७.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केलें नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने महाराष्ट्र राज्य होमगार्डस् व नागरी संरक्षण यांच्याकडे दि. ८.२.२००५ नंतर संपूर्ण महाराष्ट्रातील ज्या मानसेवी होमगार्डची पदोन्नती झालेली आहे अशा सर्वांचे दहावी उत्तीर्ण असलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती, संघटनेत मानसेवी पदे व हुद्दे कोणते आहेत याबाबतची कागदोपत्री माहिती, होमगार्ड आधुनिकीकरणा अंतर्गत वाहने घेतलेली आहेत ती कोणत्या जिल्हयासाठी खरेदी केलेली आहेत व ही वाहने सध्या कोण वापरत आहेत, तसेच त्यांना या गाडया वापरण्याबाबत देण्यात आलेल्या आदेशाची प्रत, महासमादेशक, होमगार्डस् महाराष्ट्र राज्य यांच्या आस्थापनेवरील वरिष्ठ प्रशासनिक अधिकारी हे पद व्यपगत झाले आहे ते पुन्हा पुर्नजिवित करण्याबाबत कोणते प्रयत्न करण्यांत येत आहेत याबाबतच्या पत्र व्यवहाराच्या प्रती, नागरी संरक्षण दलाच्या किती पदांचा कार्यभार होमगार्ड मधील वेतनी अधिका-याकडे आहे, २००६-०७ या आर्थिक वर्षातील अनुदानातील किती रक्कम न वापरता शासनास परत केली, बृहन्मुंबईच्या पटावर मानसेवी पदे किती आहेत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकाराने मागितलेली माहिती संकलित करण्यात येत असल्याच्या कारणावरुन दिर्घ काळ उलटून गेल्यानंतरही अपिलकारास माहिती दिलेली नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०४६/०२**

**श्री. हरि गंगाधर गुंजाळ,** **------ अपीलकर्ता**
**मु.पो.कणगर, ता. राहुरी,**
**जि.अहमदनगर-४१३ ७०६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप सचिव (रोहयो-४),**
**नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अवर सचिव (रोहयो-४),**
**नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. हरि गंगाधर गुंजाळ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, रोहयो-४, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दि.२४.१२.२००५ रोजी अर्ज करुन मौ.धनगरवाडी, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथील गट नं.६ मध्ये असलेल्या दगड खाणीचे पाझर तलावाचे पाणी पाझरुन झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबतच्या प्रकरणाच्या कागदपत्राच्या प्रतींची मागणी केली होती.

प्रस्तुत प्रकरण १३ वर्षापूर्वीचे असल्याने अपिलकाराने मागणी केलेली कागदपत्रे विभागात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, नियोजन विभाग यांनी दि.३१.१.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय यांच्याकडे दि.२१.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने सदर प्रकरणी उप/सह सचिव, नियोजन विभाग यांच्याकडे अपील करणे अभिप्रेत असल्याने अपिलकाराचे दि.२१.९.२००७ चे मुख्य सचिवांच्या कार्यालयात दाखल केलेले अपील फेटाळण्यात आल्याचे दि.१ ऑक्टोबर,२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविण्यांत आले. माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची दि.१६.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणी करिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मौ.धनगरवाडी, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथील गट नं.६ मध्ये असलेल्या दगड खाणीचे पाझर तलावाचे पाणी पाझरुन झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबतच्या प्रकरणाच्या कागदपत्राच्या प्रतींची मागणी केली होती. सदर प्रकरण १३ वर्षापूर्वीचे असल्याने मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध नसल्याने नियोजन विभागाने विभागीय आयुक्तांकडून अहवाल मागविला. विभागीय आयुक्तांच्या अहवालानुसार अपिलकाराने खाणीची जागा दि.२४.१.१९८६ रोजी विकत घेतली. त्यापूर्वी पासून त्या जागेच्यालगत रोहयो अंतर्गत पाझर तलाव असून, पाझर तलावाची पातळी खाणीच्या पातळीपेक्षा खाली आहे. तलाव पूर्ण भरल्यावर पाणी पाझरुन खाणीच्या जागेत जाण्याची शक्यता आहे. अपिलकार यांची जागा शासनाने संपादित केलेली नाही. पाझर तलाव पूर्वीपासूनच असून अपिलकाराची नुकसान भरपाईची मागणी नियमानुसार नाही व ती देय ठरत नाही. जुनी कागदपत्र उपलब्ध नाहीत ही वस्तुस्थिती असून अर्जदाराच्या मागणी संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे वस्तुस्थिती असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (रोहयो), नियोजन विभाग यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन युक्तिवाद केला. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे. अपिलकाराने मागणी केलेल्या प्रकरणी नियोजन विभागाने विभागीय आयुक्तांकडून मागविलेल्या दि.१५.१०.२००८ च्या अहवालाची प्रत अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आंत उपलब्ध करुन द्यावी.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१००९/०२**

**श्री. मोहम्मद साजिद सय्यद, ------ अपीलकर्ता**
**शॉप नं.१/ १०२, न्यू भर्दावाडी विनस टॉवर जवळ,**
**वाय.डब्लू. सी.ए.हॉस्टेल समोर,**
**भर्दावाडी, जे.पी.रोड,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०७८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के पश्चिम विभाग,**
**पालिराम पथ, अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०७८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता, (इमारत व बांधकाम),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के पश्चिम विभाग,**
**पालिराम पथ, अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०७८. ------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मोहम्मद साजिद सय्यद यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि. १९.९.२००७ रोजी अर्ज करुन, जे.पी.रोड, अंधेरी (प.), मुंबई-७८ व वॉर्ड क्र.६१ मध्ये भर्डावाडी न्यू येथील सोनल क्लासिक सोसायटी लि. या इमारतीत पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्र.१०१ व १०२ मध्ये एच-४-यू फिटनेस सेंटर उघडण्यात आले आहे. याबाबत अनुषंगिक चार मुद्दयांची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, के/पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि. २२.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपिलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जे.पी.रोड, अंधेरी (प.), मुंबई-७८ व वॉर्ड क्र.६१ मध्ये भर्डावाडी न्यू येथील सोनल क्लासिक सोसायटी लि. या इमारतीत पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्र.१०१ व १०२ मध्ये एच-४-यू फिटनेस सेंटर उघडण्यात आले आहे. याबाबत अनुषंगिक चार मुद्दयांची माहिती मागितली होती. सदर हेल्थ क्लब ज्या इमारतीत आहे ती निवासी वापराची जागा आहे अथवा व्यापारी जागा आहे, जर घरगुती वापराची जागा असल्यास सदरच्या जागेत फिटनेस सेंटरला परवानगी कोणत्या आधारे देण्यात आली, सदर सेंटरला जाण्याकरिता बाहेरुन जिना लावला आहे, सदर जिना खाजगी वापरासाठी आहे. सदरच्या जिन्यासाठी जन माहिती अधिकाराच्या विभागातून कोणत्या आधारे परवानगी देण्यात आली, इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांनी कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्ये आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे. हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१००८/०२**

**श्री. मोहम्मद साजिद सय्यद,** **------ अपीलकर्ता**
**शॉप नं.१/ १०२, न्यू भर्दावाडी विनस टॉवर जवळ,**
**वाय.डब्लू. सी.ए.हॉस्टेल समोर,**
**भर्दावाडी, जे.पी.रोड,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०७८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के पश्चिम विभाग,**
**पालिराम पथ, अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०७८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता, (इमारत व बांधकाम),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के पश्चिम विभाग,**
**पालिराम पथ, अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०७८.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मोहम्मद साजिद सय्यद यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि. २३.८.२००७ रोजी अर्ज करुन, के/डब्लू विभागात वॉर्ड क्र.६१ मधील सागर शॉपिंग सेंटर, ७६, जे.पी.रोड, अंधेरी येथे विनोद कोठारी यांच्या मालकीचे कांचन ज्वेलर्स दुकान आहे. सदर दुकानात इमारतीच्या मूळ संरचनेत काही बदल करण्यांत आले आहेत. याबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, के पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि.१२.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने के/डब्लू विभागात वॉर्ड क्र.६१ मधील सागर शॉपिंग सेंटर, ७६, जे.पी.रोड, अंधेरी येथे विनोद कोठारी यांच्या मालकीचे कांचन ज्वेलर्स दुकान आहे. सदर दुकानात इमारतीच्या मूळ संरचनेत काही बदल करण्यांत आले आहेत. याबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. या दोन्ही अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे. हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०५०/०२**

**श्री. अनिलकुमार इंद्रमल गुप्ता,** **------ अपीलकर्ता**
**पारशीवाडी, रामप्रसाद वर्मा चाळ,रुम नं.३,**
**घाटकोपर (प.), मुंबई.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-६**
**चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष,**
**चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.** **------- उत्तरवादी**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. अनिलकुमार इंद्रमल गुप्ता, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, नियंत्रण कक्ष, चेंबूर, मुंबई, यांच्याकडे दि.१७.८.२००७ रोजी अर्ज करुन, पोलीस आयुक्त यांच्याकडे दि.२०.२.२००७ रोजी केलेल्या तक्रारीबाबत, घाटकोपर पोलीस ठाणे येथे नोंद असलेला गुन्हा रजि.क्र.३७४/२००७, कलम ३२५, ३४, भादवि गुन्हयात वैद्यकीय पुराव्यात कोणत्या स्वरुपाच्या जखमा आहेत याची माहिती पोलीस आयुक्तांकडे दि. २१.५.२००७ व ३१.५.२००७ रोजी सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांना दि.६.९.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास मुद्देनिहाय माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-६, चेंबूर, मुंबई यांच्याकडे दि.२७.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती पुरविली असल्याने तीच माहिती परत अपिलकारास पुरविण्याची गरज नाही असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि. २९.९.२००७ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जाणूनबुजून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१०.२००८

रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-याचें म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने पोलीस आयुक्त यांच्याकडे दि.२०.२.२००७ रोजी केलेल्या तक्रारीबाबत, घाटकोपर पोलीस ठाणे येथे नोंद असलेला गुन्हा रजि.क्र.३७४/२००७, कलम ३२५, ३४, भादवि गुन्हयात वैद्यकीय पुराव्यात कोणत्या स्वरुपाच्या जखमा आहेत याची माहिती पोलीस आयुक्तांकडे दि.२१.५.२००७ व ३१.५.२००७ रोजी सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. ६.९.२००७ च्या पत्रासोबत मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक व नियमानुसार माहिती दिली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०१०/०२**

**श्री. मधुसुदन हरिश्चंद्र हटकर, ------ अपीलकर्ता**
**किणी चाळ, मेघदूत बिल्डिंगच्या मागे,**
**फिरोजशहा मेहता रोड,**
**विलेपार्ले, (पूर्व), मुंबई४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०५९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०५९. ------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मधुसुदन हरिश्चंद्र हटकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि. २०.६.२००७ रोजी अर्ज करुन, बनट किणी नावाच्या व्यक्तिने अनधिकृतपणे बांधकाम करुन अपिलकाराच्या किणी चाळ, मेघदूत बिल्डिंगच्या मागे, फिरोजशहा मेहता रोडवर असलेल्या घराच्या भिंतीचे नुकसान केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि. २५.७.२००७ रोजी पत्र पाठवून मनपा अधिनियम, ३५१ अन्वये बनट किणी यांच्या अनधिकृत बांधकामास दिलेल्या नोटीशीची प्रत, कार्यालयात योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेण्याबाबत कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, के/पूर्व विभाग, मनपा, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि.१३.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१२.७.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली. मागितलेली माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत

आली. सुनावणीकरिता नोटीस युपीसी ने पाठवूनही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने बनट किणी नावाच्या व्यक्तिने अनधिकृतपणे बांधकाम करुन अपिलकाराच्या किणी चाळ, मेघदूत बिल्डिंगच्या मागे, फिरोजशहा मेहता रोडवर असलेल्या घराच्या भिंतीचे नुकसान केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराच्या घराच्या भिंतीचे नुकसान झाले असून, त्यांच्या घरावरील पत्रा तोडला आहे. याबाबत अपिलकाराने बनट किणी याना जाब विचारला असता अपिलकाराच्या झालेल्या नुकसानीची भरपाई करुन देण्यात येईल असे सांगितले. परंतु त्यांनी अपिलकारास कोणत्याही प्रकारचाी नुकसान भरपाई दिलेली नाही. अपिलकाराच्या भिंतीवर अनधिकृतपणे विद्युत मीटर बनट किणी यांनी बसविले आहे. त्यामुळे अपिलकाराच्या घरास धोका निर्माण झाल्याची अपिलकाराची धारणा झाली आहे. पुढील अनर्थ टाळून अनधिकृतपणे बांधकाम करणा-या व्यक्तिवर कारवाई करुन, त्याने केलेले अनधिकृत बांधकाम जमिनदोस्त करावे अशी अपिलकाराची मागणी आहे. बनट किणी यांच्या अनधिकृत बांधकामास जन माहिती अधिका-यांनी मनपा अधिनियम, ३५१ अंतर्गत दि. १६.४.२००७ अन्वये नोटीस बजावली होती. सदर नोटीशीस बांधकाम धारकांने मा.उच्च न्यायालयात एल.सी.सूट क्र. ३१८/२००७ अन्वये आव्हान दिल्याने सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३.१२.२००७ रोजी कळविले असल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते.या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, कथित अनधिकृत बांधकामास जन माहिती अधिका-यांनी मनपा अधिनियमा अंतर्गतच्या कलम ३५१ अन्वये दिलेल्या नोटीसीच्या प्रतीची अपिलकाराने द्वितीय अपिलात मागणी केली आहे. सदर नोटीसीची प्रत अपिलकारास देण्याची जन माहिती अधिका-याने तयारी दर्शविली आहे. तरी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत जन माहिती अधिका-याने अपिलकारास कलम ३५१ अंतर्गत दिलेल्या नोटीसीची प्रत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१००४/०२**

**श्री. राजेश गोविंद हेगडे,** **------ अपीलकर्ता**
**१२/६, के.डी.गायकवाड नगर,**
**जुनी बीएमसी कॉलनी, रावळी कॅम्प,**
**मुंबई४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सह महानगर आयुक्त,**
**एम.एम.आर.डी.ए.वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**एम.एम.आर.डी.ए.वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. राजेश गोविंद हेगडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, एमएमआरडीए, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.६.८.२००७ रोजी अर्ज करुन, एमएमआरडीए वसाहत, कोकरी आगार, अॅन्टॉप हिल, वडाळा, मुंबई येथे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पा अंतर्गत प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसना संबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधी उलटून गेल्यानंतर दि.१३.९.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. दिलेली माहिती दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. ५.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले. सदर अपिलावर दि. १७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने एमएमआरडीए, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.६.८.२००७ रोजी अर्ज करुन, एमएमआरडीए वसाहत, कोकरी आगार, अॅन्टॉप हिल, वडाळा, मुंबई येथे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पा अंतर्गत प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. दि.२९.१२.२००० रोजी स्पार्क, म्हाडा, एमएमआरडीए यांनी केलेल्या करारपत्राची प्रत तसेच सिवेज प्लॅन्टवर असलेले मड मिक्सिंगचे मशीन तीन वर्षापासून कोठे आहे याबद्दल माहिती मागितली होती. दि.२९.१२.२००० रोजी स्पार्क, म्हाडा, एमएमआरडीए यांनी केलेले करारपत्र अभियांत्रिकी विभागाकडे नाही, सिवेज ट्रिटमेंट प्लॅन्टसहित गटार यंत्रणा इ.ची देखभाल व हाताळणी करण्याकरिता स्पार्क संस्थेला देण्यात आली आहे असे जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.१३.९.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. यावरुन मुद्दा क्र.१ बाबतची माहिती कार्यकारी अभियंता यांच्याशी संबंधित नसल्याची जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली. यासंदर्भात जन माहिती अधिका-यांनी उक्त अधिनियमातील कलम-६ (३) (दोन) मधील परंतुकाप्रमाणे विहित कालावधीत कार्यवाही केलेली नसल्याचे दिसते. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांच्या आंत प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित करुन योग्य ते आदेश पारित करावेत. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशान्वये अपिलकाराचे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा त्यांचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०१३/०२**

**श्री. प्रकाश वरावडेकर,** **------ अपीलकर्ता**
**६९/सी, काशीनाथ धुरु वाडी,**
**गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल,**
**मुंबई४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. प्रकाश वरवडेंकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे अर्ज करुन, (१) Ciprofloxacin HCL. (२) Glipizide, (३) Salbutamol Sulphate या तीन उत्पादनाबाबत सदर उत्पादनाच्या किंमत अंतिम करताना कोणत्या उत्पादकाच्या उत्पादनाची किंमत ग्राहय धरण्यांत आली आहे याबाबत माहिती मागितली होती.

अपिलकाराचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी कार्यालयात आढळून आला नाही. मुख्य माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाची प्रत अपिलकाराने त्यांच्या दि. १०.७.२००७ च्या पत्रासोबत जोडली आहे. ती विचारात घेऊन तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.वानखेडे यांनी प्रथम अपिलावर दि. २४.९.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिका-याने/ प्रथम अपिलीय अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली माहिती ही दर निश्चितीबाबतची आहे. सार्वजनिक आरोग्य विभागासाठी जी औषधे व साधनसामुग्री खरेदी केली जाते त्याचे दरकरार सर्वसाधारणपणे संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्यामार्फत करण्यात येतात व त्यावर सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे नियंत्रण असते. ज्या बाबींचे दरकरार त्यांचेकडून करण्यांत येत नाहीत अशी उत्पादने एकतर आकस्मिक परिस्थितीत बाजारभावाने खरेदी करण्यात येतात अथवा अन्य दरकरार जसे की, ई.एस.आय.सी. अथवा बी.एम.सी. यांचे दरकरारावर जी औषधे असतील ती त्या दर करारानुसार खरेदी करण्यांत येतात. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कोणत्याही औषधांचे दर निश्चित करण्यात येत नाहीत अथवा साठा करण्यांत येत नाही. दरकरारावर नसलेले एखादे औषध खरेदी करावयाचे असेल तर जाहीर निविदा प्रसिध्द करुनच अशी औषधे खरेदी करण्यात येतात असा प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन युक्तिवाद केला. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त

झाल्यापासून ४५ दिवसांचे आंत प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशान्वये अपिलकाराचे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा त्यांचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१००५/०२**

**श्री. राजेश गोविंद हेगडे,** **------ अपीलकर्ता**
**१२/६, के.डी.गायकवाड नगर,**
**जुनी बी.एम.सी.कॉलनी,**
**रावळी कॅम्प, मुंबई४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,(पर्जन्य जलवाहिन्या),**
**सिमेंट गोडाऊन, एन.एम.जोशी मार्ग,**
**भायखळा (प.), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,(पर्जन्य जलवाहिन्या),**
**पूर्व उपनगरे, पंतनगर, घाटकोपर, मुंबई- ४०० ०७५.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. राजेश गोविंद हेगडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने, जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका (पर्जन्य जलवाहिन्या), घाटकोपर, मुंबई यांच्याकडे दि. ९.८.२००७ रोजी अर्ज करुन, माहुल क्रिक नाला (तानसा पाईप लाईन ते बी.पी. टी.रोड) या ठिकाणी टाकण्यात आलेल्या रॅबीट बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१०.९.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास एकूण सहा मुद्दयांवर मुद्देनिहाय माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख अभियंता, बृहन्मुंबई महानगपालिका, यांच्याकडे दि.५.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि. ९.८.२००७ च्या पत्रान्वये माहुल क्रिक नाला (तानसा पाईप लाईन ते बी.पी. टी.रोड) या ठिकाणी टाकण्यात आलेल्या रॅबीट बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मुद्देनिहाय माहिती दि. १०.९.२००७ च्या पत्रान्वये दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती दिशाभूल करणारी व विहित वेळेत दिली नसल्याचे अपिलकाराने सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकाराच्या प्रथम अपिलावर हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. सदर आदेशाने अपिलकाराचे समाधान झाले नाही तर त्यांचा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९९८/०२**

**श्री. लेस्ली अल्मेडा,** **------ अपीलकर्ता**
**कासा अल्मेडा, फ्लॅट नं.१०३,**
**१, सेंट जोसेफ रोड, सेंट पॉल रोड,**
**वांद्रे (प.), मुंबई४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**विभागीय जिल्हा निबंधक सहकारी संस्था,**
**गृहनिर्माण भवन, म्हाडा बिल्डिंग, तळमजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप निबंधक सहकारी संस्था, एच/डब्लू वॉर्ड,**
**सहकार बाजार, ४ था मजला, वांद्रे रेल्वे स्टेशनसमोर,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. लेस्ली अल्मेडा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, एच/डब्लू वॉर्ड, वांद्रे (प), मुंबई यांच्याकडे दि.२०.६.२००७ रोजी अर्ज करुन, उपनिबंधक सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग, मुंबई यांच्याकडे दि. ११.६.२००७ रोजी कलम १५२-अे अन्वये फाईल केलेल्या सॅलसेट कॅथलिक को.ऑप.हौ.सोसा.लि. वांद्रे (प.), मुंबई या संस्थेबाबत उपनिबंधक यांचेकडील दि.१५.६.२००७ रोजीच्या पत्राची छायाप्रत, उपनिबंधक यांचे कडील दि.१५.६.२००७ चे निवडणूक अधिकारी यांना दिलेले पत्र, त्याच दिवशीच्या रोजनाम्याची सत्यप्रत, कलम १५२-अे खाली दिलेल्या आदेशाची प्रत तसेच जानेवारी, २००६ पासूनच्या व्हिजिटर बुकाची प्रत इ. माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिका-याच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती समक्ष येऊन प्राप्त करुन घ्यावी असे दि. २९.६.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी मागितलेली माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय जिल्हा निबंधक सहकारी संस्था यांचेकडे दि.२७.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२५.८.२००७ रोजी आदेश पारित केले. अपिलकाराने मागितलेली कागदपत्रे उपनिबंधक सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग या कार्यालयाच्या अभिलेख कक्षामध्ये किंवा

त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. त्यामुळे ती त्यांना देणे आवश्यक आहे. तरी अपिलकाराने मागणी केलेल्या कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिका-यांनी तात्काळ द्याव्यात असे आदेशात नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले आहेत.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि.२०.६.२००७ रोजी अर्ज करुन, उपनिबंधक सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग, मुंबई यांच्याकडे दि. ११.६.२००७ रोजी कलम १५२-अे अन्वये फाईल केलेल्या सॅलसेट कॅथलिक को.ऑप.हौ.सोसा.लि. वांद्रे (प.), मुंबई या संस्थेबाबत उपनिबंधक यांचेकडील दि.१५.६.२००७ रोजीच्या पत्राची छायाप्रत, उपनिबंधक यांचे कडील दि.१५.६.२००७ चे निवडणूक अधिकारी यांना दिलेले पत्र, त्याच दिवशीच्या रोजनाम्याची सत्यप्रत, कलम १५२-अे खाली दिलेल्या आदेशाची प्रत तसेच जानेवारी, २००६ पासूनच्या व्हिजिटर बुकाची प्रत इ. माहिती मागितली होती. सदर माहिती जन माहिती अधिका-याच्या कार्यालयात उपलब्ध असल्याने सर्व संबंधित कागदपत्राच्या प्रती अपिलकारास तात्काळ उपलब्ध करुन द्याव्यात असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २५.८.२००७ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी अद्याप आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिका-याने अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती द्यावी. अन्यथा त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०५९/०२**

**श्री. विजय शामदेव,**
**द्वारा- ॲड. श्रीराम कृष्णा मिश्रा,** ------ **अपीलकर्ता**
**५१३, श्री साई शिवशाही बिल्डिंग मर्या.**
**गोमाता नगरच्या समोर,**
**लोअर परेल, (प.), मुंबई-४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**मुंबई प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ,**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व),मुंबई - ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा विद्युत निरीक्षक,**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** ------- **उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. विजय शामदेव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडे दि.६.८.२००७ रोजी अर्ज करुन, श्री.अनिल शामदेव यांना दि.२८ जुलै, २००१ रोजी झालेल्या प्राणांतिक अपघातासंबंधात अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-याने दि. ११.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.२६.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास खालीलप्रमाणे माहिती दिली.

श्री.अनिल शामदेव यांना दि.२८ जुलै,२००१ रोंजी झालेल्या अपघातास सहा वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद-१२१ मधील परिशिष्ट ६ (४) अन्वये विद्युत अपघाताबाबत नस्ती पाच वर्षे ठेवण्यात येतात. विद्युत निरीक्षक, मुंबई यांनी सदर कालावधीची नस्ती उपलब्ध नसल्याचे अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि. ११.१२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि.६.८.२००७ रोजी अर्ज करुन श्री.अनिल शामदेव यांना दि.२८ जुलै, २००१ रोजी झालेल्या प्राणांतिक अपघातासंबंधात अनुषंगिक माहिती मागितली होती. यासंदर्भात अपिलकाराने मा.मुख्य माहिती आयुक्तांकडे उक्त अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये दि.१८.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. त्या अपील क्र.३१०७ ची सुनावणी दि.१५.१०.२००८ रोजी घेण्यात येवून दिनांक १७.१०.२००८ रोजी आदेश पारित केले आहेत. अपिलकाराने मागितलेले कागदपत्र अस्तित्वात नसल्याचे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे मान्य करुन मा. मुख्य माहिती आयुक्तांनी अपिलकाराचे द्वितीय अपील निकालात काढले आहे. या परिस्थितीत या प्रकरणी वेगळे आदेश देण्याची आवश्यकता नाही.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०६३/०२**

**श्री. गौतम विजय बोरा,** **------ अपीलकर्ता**
**२५३८, एम.जी.रोड,**
**अहमदनगर- ४१४ ००१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मा.संचालक (माहिती, वृत्त व जनसंपर्क),**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. गौतम विजय बोरा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.३०.८.२००७ रोजी अर्ज करुन, दि.५.१.२००७ रोजी अपिलाच्या सुनावणीसंबंधी लेखी म्हणणे दि.३.१.२००७ रोजी विभागीय माहिती कार्यालय, नाशिक येथे उपस्थित राहून महासंचालक, माहिती व जनसपर्क महासंचालनाय यांना सादर केले त्या पत्राची व पत्रासोबत जोडलेल्या प्रतिज्ञा पत्राची साक्षांकित प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२४.९.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिशाभूल करणारी खोटी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.३.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ५.११.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी माहितीचा अधिकार अधिनियमानुसार अपिलकारास विहित मुदतीत आवश्यक ती माहिती पुरविलेली आहे, अपिलकाराच्याच पत्राची व प्रतिज्ञापत्राची साक्षांकित प्रत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२४.९.२००७ च्या पत्रान्वये दिली आहे. तेव्हा सदर माहिती दिशाभूल करणारी कशी असेल याचा बोध होत

नाही. या पार्श्वभूमीवर अपिलकाराचे प्रथम अपील स्वीकारार्ह ठरत नसल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपील फेटाळले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि.५.१.२००७ रोजी अपिलाच्या सुनावणीसंबंधी लेखी म्हणणे दि.३.१.२००७ रोजी विभागीय माहिती कार्यालय, नाशिक येथे उपस्थित राहून महासंचालक, माहिती व जनसपर्क महासंचालनाय यांना सादर केले त्या पत्राची व पत्रासोबत जोडलेल्या प्रतिज्ञा पत्राची साक्षांकित प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे मागणी केली होती. अपिलकाराच्याच पत्राची व प्रतिज्ञापत्राची साक्षांकित प्रत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत उपलब्ध करुन दिली. सदर माहिती खोटी व कशी दिशाभूल करणारी आहे हे अपिलकाराने सिध्द केलेले नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्राची तपासणी करण्यास परवानगी द्यावी. त्यानंतर अपिलकारास उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती द्याव्यात.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०५६/०२**

**श्रीमती मंजूबेन रमेशकुमार शेठ ------ अपीलकर्ता**
**फ्लॅट नं.९, खटाव बिल्डिंग, २ रा मजला,**
**२२/२८, ३ रा पांजरापोळ लेन,**
**सी.पी.टँक, टँक रोड, मुंबई-४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**महापालिका आयुक्तांचे स्वीय चिटणीस,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**१० एस.के.हाफिजउद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई- ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**१० एस.के.हाफिजउद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई- ४०० ००८. ------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती मंजूबेन रमेशकुमार शेठ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.१.२००८रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ई वॉर्ड, भायखळा, मुंबई यांच्याकडे दि. १८.८.२००७ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.३१७०, भुलेश्वर विभाग, मुंबई-४, सी विभाग, पांजरापोळ लेन, सी.पी.टँक रोड येथील खटाव इमारतीमधील फ्लॅट नं.८ चे टेरेसवरील बांधकामाविषयी परवानगी पत्राची छायाप्रत तसेच इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ३.१२.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.५.१२.२००७ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशानुसार सहाय्यक अभियंता, (इमारत व कारखाने) सी विभाग यांनी अपिलकाराने केलेल्या तक्रारी संबंधी स्थळ निरीक्षण करुन अपिलकारास हवी असलेली माहिती १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशानुसार जन माहिती

अधिका-याने अपिलकारास आवश्यक ती माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने सिटी सर्वे क्र.३१७०, भुलेश्वर विभाग, मुंबई-४, सी विभाग, पांजरापोळ लेन, सी.पी.टँक रोड येथील खटाव इमारतीमधील फ्लॅट नं.८ चे टेरेसवरील बांधकामाविषयी परवानगी पत्राची छायाप्रत तसेच इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती देणे सोईचे व्हावे म्हणून स्थळ तपासणी करुन अपिलकारास माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ५.१२.२००७ रोजी आदेश पारित केले आहेत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने), सी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशानुसार अपिलकारास हे आदेश प्राप्त झ ाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती उापलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालपन अहवाल आयोगास सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०६२/०२**

**श्री. किशोर शंकरराव पवार,** **------ अपीलकर्ता**
**१३९/४६९८, उल्हास को.ऑप.हौ.सोसायटी,**
**नेहरु नगर, कुर्ला (पूर्व),मुंबई-४०० ०२४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**आयुर्वेद महाविद्यालय, शीव स्टेशनजवळ,**
**शीव, मुंबई- ४०० ०२२.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य,**
**आयुर्वेद महाविद्यालय, शीव स्टेशनजवळ,**
**शीव, मुंबई- ४०० ०२२.** **----- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. किशोर शंकरराव पवार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई, यांच्याकडे दि.१२.९.२००७ रोजी अर्ज करुन, श्री. नटराज बिल्डिर्स यांना बिल्डिंगचे अर्धवट सोडलेले काम पूर्ण करण्याकरिता दिलेल्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या का, असल्यास कधी, कोणत्या पेपरात जाहीरात आली होती, त्या वर्तमानपत्राचे नांव, तारीख व निविदाच्या छायाप्रतीची तसेच अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-याने दि. ११.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. १६.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२९.११.२००७ च्या पत्रान्वयें अपिलकारास माहिती दिली. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राजय माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात दि.१२.५.२००७ रोजी अर्ज करुन नटराज बिल्डिर्स यांना बिल्डिंगचे अर्धवट सोडलेले काम पूर्ण करण्याकरिता दिलेल्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या का, असल्यास कधी, कोणत्या पेपरात जाहीरात आली होती, त्या वर्तमानपत्राचे नांव, तारीख व निविदाच्या छायाप्रतीची तसेच अनुषंगिक माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जावर नियमाप्रमाणे रु.१०/-इतक्या रकमेचा कोर्ट फी स्टॅम्प लावला नाही अथवा रोखीने पैसे भरले नाहीत. अपिलकार दारिद्रय रेषेखालील नाही. त्यामुळे उक्त अधिनियमातील कलम ६ (१) अन्वये अपिलकाराने केलेल्या अर्जाला, अर्जाचा दर्जा प्राप्त होत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकाराचा अपील अर्ज दाखल करुन घेतला नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२९.११.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास तस कळविले. अपिलकारास माहिती हवी असल्यास, विहित कार्यपध्दतीनुसार अर्ज करुन जन माहिती अधिका-याकडे मागणी करावी. त्यानुसार अपिलकारास हवी असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास पूर्णपणे सहकार्य करण्यांत येईल. दि. ११.१०.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास सौजन्यादाखल माहिती देण्यात आली असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार कार्यवाही केली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयात कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७५३/०२**

**श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर,** **------ अपीलकर्ता**
**अंजना इस्टेट चाळ नं.१२, रुम नं.४,**
**भाटीया हॉस्पिटलसमोर,भांडूप व्हिलेज रोड,**
**भांडूप (प.),मुंबई-४०० ०७८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख न्यायाधीश,**
**कौटुंबिक न्यायालय,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा, प्रबंधक,**
**कौटुंबिक न्यायालय,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **----- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, कौटुंबिक न्यायालय, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.५.५.२००७ रोजी अर्ज करुन, त्यांनी दि.२१.१०.२००५ व दि.१०.११.२००५ रोजी अपिलकाराने स्वतःच्या घटस्फोट प्रकरण क्र.ए-१९४६/१९९३ व प्रकरण क्र.२८१/२००५ हया कौटुंबिक न्यायालयातील फांईलच्या साक्षांकित प्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि. ३१ मे,२००७ रोजी अपिलकारास पत्र पाठवून मागितलेल्या माहितीच्या नकला घेण्यासाठी प्रबंधक यांच्या चेंबरमध्ये हजर रहाण्याबाबत कळविले होते. मागितलेली माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, यांच्याकडे दि.११.६.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिका-यांकडे दि.२१.१०.२००५ व दि.१०.११.२००५ रोजी स्वतःच्या घटस्फोट प्रकरण क्र.ए-१९४६/१९९३ व प्रकरण क्र.२८१/२००५ हया कौटुंबिक न्यायालयातील फाईलच्या साक्षांकित प्रतीची मागणी केली होती. त्यावर प्रबंधक कै.एन.एन.काझी यांनी अपिलकार यांना माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रबंधक यांच्या दालनात हजर रहाण्याबाबत दि. १९.६.२००७ रोजी पत्र पाठवून कळविले होते. दरम्यानच्या कालावधीत अपिलकाराने दि.११.६.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. त्यामुळे प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी No Action Necessary असे आदेश दिले. दि. २१.५.२००७ च्या नोटीसीप्रमाणे अपिलकार दि. ९.७.२००७ रोजी नकला घेण्याकरिता कार्यालयात हजर झाल्या. मागणी केल्याप्रमाणे नकला नाहीत या कारणावरुन अपिलकारांनी नकला घेण्यास नकार दिला.

अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधी अभिलेखाची तपासणी केली असता सदरहू केसमध्ये मोस्तर लिपिकाने निशाणी क्र.३४ ते ३७ व निशाणी क्र.५५ व ५६ हे सी फाईलला न लावल्यामुळे (सी फाईलच्या डॉकेटवर निशाणी क्र.३४ ते ३७ व निशाणी क्र.५५ ते ५६ अशी नोंद नाही.) कागदपत्र नकलेसाठी उपलब्ध होऊ शकले नाहीत. तसेच डी फाईलची रेकॉर्ड विभागाकडून फाडणी झाल्याकारणाने (डी फाईलचे डॉकेट उपलब्ध नाही.) नकलेसाठी उपलब्ध्ध होऊ शकले नाहीत. सदरहू केस क्र.ए-१९४६/१९९३ ही दि. २९.४.२००० रोजी निकाली काढली. या केसमधील डी फाईलची फाडणी दि.२.६.२००५ रोजी झाली.अपिलकार श्रीमती जयश्री बाबर यांनी नकलेसाठी कौटुंबिक न्यायालयामध्ये ऑक्टोबर, २००५ रोजी अर्ज केला, असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. तसेच न्यायालयाने माहिती देण्याचे टाळले किंवा पुरावे लपविले असे अपिलकाराचे म्हणणे योग्य नाही, असाही जन माहिती अधिका-यांनी युक्तिवाद केला. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची फाईल कौटुंबिक न्यायालयाने नष्ट केली असल्यामुळे अपिलकारास कागदपत्र उपलब्ध करुन देता आली नाहीत. सदरहू वस्तुस्थिती जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासन १५ दिवसाचे आंत अपिलकारास कळवावी.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०५८/०२**

**श्री. प्रशांत भगवान सौदागर,** **------ अपीलकर्ता**
**सदनिका क्र.सी-२२, भूखंड क्र.१४५,**
**आर.एस.सी.४, मालवणी अमेय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**मालवणी, मुंबई-४०० ०९५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक,**
**उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**प्रधान सचिव, (सहकार),**
**सहकार व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **----- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. प्रशांत भगवान सौदागर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि. ३.९.२००७ च्या अर्जान्वये उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई मंडळ यांचे क्र.४९६, दि.२४ जुलै, २००७ च्या पत्रानुसार निवडणूक अधिकारी म्हणून श्रीमती व्ही.आर.हेगडे यांची निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केलेल्या आदेशाची छायांकित प्रमाणित प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती ही संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून घेण्यात यावी. तशा सूचना संस्थेला देण्यात येत असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविले. मागितलेली माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे दि. २५.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.५.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

" महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (१) अन्वये आर.एस.सी.४ मालवणी अमेय को.ऑप.हौ.सो.लि. मालवणी पश्चिम, मुंबई नं.९५ या संस्थेचे सभासद श्री.प्रशांत भगवान सौदागर यांनी या कार्यालयाकडे त्यांनी संस्थेच्या निवडणुकीबाबतची मागितलेली माहिती त्यांना नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत देवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. "

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि. ३.९.२००७ च्या अर्जान्वये उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई मंडळ यांचे क्र.४९६, दि.२४ जुलै, २००७ च्या पत्रानुसार श्रीमती व्ही.आर.हेगडे यांची निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केलेल्या आदेशाची छायांकित प्रमाणित प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. संस्थेला विचारात न घेता उप निबंधक सहकारी संस्था मुंबई मंडळ यांनी संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवडणुक घेण्याकरिता निवडणूक निर्णय अधिका-याची नेमणूक केली. निवडणूक निर्णय अधिका-याने विद्यमान संस्थेचे कार्यकारी पदाधिका-याशी संपर्क न साधता परस्पर निवडणूक घेतल्याचे दाखवून त्याचा अहवाल निबंधकांना दिला. तो अहवाल संस्थेच्या वार्षिक किंवा विशेष सर्वसाधारण सभेने स्विकारलेला नसताना निबंधकांनी ही बाब विचारात न घेता अहवालानुसार जे संस्थेचे अधिकृत सभासद नाहीत त्यांनाच ते कार्यकारी मंडळावर निवडून आल्याचे जाहीर केले असा अपिलकाराने सुनावणीच्या वेळेस युक्तिवाद केला.प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागितलेली माहिती दिली नाही. अपिलकाराने केलेला युक्तिवाद लक्षात घेता या प्रकरणी सहकार उप विभागाने लक्ष घालून अपिलकाराने उपस्थित केलेल्या मुंद्दयाबाबत वरिष्ठ स्तरावर चौकशी करुन सदर प्रकरण विल्हेवारी लावण्याची कार्यवाही करावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई /दिनांक :-२०/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०५७/०२**

**श्री. सरोजकुमार शिवशंकर तिवारी,** **------- अपीलकर्ता**
**रुम नं.१०६, इमारत क्र.बी-१,**
**गावदेवी वसाहत, लिक रोड,**
**गोरेगांव (प.), मुंबई-४०० ०९०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग,**
**मिठानगर महानगरपालिका शालेय इमारत,**
**मिठानगर, गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग,**
**मिठानगर महानगरपालिका शालेय इमारत,**
**मिठानगर, गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.** **----- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. सरोजकुमार शिवशंकर तिवारी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग, गोरेगांव, मुंबई यांचेकडे दि. २४.३.२००६ च्या अर्जान्वये गावदेवी कॉलनी येथील पात्र झोपडपट्टीधारकांची, झोंपडपट्टी सुधार प्राधिकरण यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत तसेच श्री.विजयकुमार जयस्वाल यांना पर्यायी सदनिका देणे बाबत पात्रतेसाठी त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रतीची मागणाी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास मागितलेली माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्य आयुक्त यांच्याकडे दि.१९.४.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.८.६.२००६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीच्यावेळी झालेल्या चर्चेनुसार अपिलकारास मागितलेली कागदपत्र दि.१६.६.२००६ रोजी देण्यात आली. श्री. शामप्रसाद जयस्वाल यांना व्यक्तिशः हजर करावे अथवा त्यांनी दिलेल्या प्राधिकार पत्राची नोंदणीकृत प्रत सादर करण्या विषयी प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास सूचना दिल्या. तथापि, दोन महिन्याचा कालावधी उलटून गेला तरी अपिलकाराने पूर्तता केली नाही. यामुळे प्रथम अपील निकाली काढण्यात आले.

समाधानकारक माहिती न देता अपील दफ्तरी दाखल केल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिका-यांकडे दि. २४.३.२००६ च्या अर्जान्वये गावदेवी कॉलनी येथील पात्र झोपडपट्टीधारकांची, झोंपडपट्टी सुधार प्राधिकरण यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत तसेच श्री.विजयकुमार जयस्वाल यांना पर्यायी सदनिका देणेबाबत पात्रतेसाठी त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रतीची मागणाी केली होती. अपिलकारास दि.१६.६.२००६ रोजी सहाय्यक आयुक्त, पी/ दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मिठानगर, गोरेगाव (प.) या कार्यालयाने क्र.सआपीट/१४७५१ वसाहत अन्वये अपिलकारास माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलाच्या सुनावणी आदेशानुसार दिसून येते. अपिलकाराने अपूर्ण माहिती मिळाली असल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. श्री.विजयकुमार जयस्वाल यांना झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत गाळा देण्याकरिता अपात्र ठरविण्यात आले. याबाबतच अपिलकारास माहिती हवी आहे. श्री.जयस्वाल यांना याप्रकरणी सामील करुन जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी निर्णय घेणे आवश्यक आहे. या परिस्थतीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराने मागणी केलेली संबंधित फाईल तपासणीकरिता अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर अपिलकाराच्या मागणीप्रमाणे उपलब्ध माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून २० दिवसांच्या आत द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०२०/०२**

**श्री. अरविंद लवू चौगुले,** **------ अपीलकर्ता**
**९९/२९८०, पंतनगर,**
**घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक,**
**निबंधक, भागीदारी संस्था यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत, ६ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,**
**निबंधक, भागीदारी संस्था यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत, ६ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. अरविंद लवू चौगुले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, निबंधक, भागीदारी संस्था यांचे कार्यालय, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दिनांक ७.६.२००७ रोजी अर्ज करुन, " निबंधक भागीदारी संस्था, मुंबई कार्यालयाच्या दि.२४.११.२००६ रोजीच्या मे.लब्धी फायनान्स कॉर्पोरेशन, नोंदणी क्र.बअ-८१७४३ या भागीदारी संस्थेसंदर्भात सूचना ज्ञापनामधील बाब क्र.८ (ब) बाबत भारतीय भागीदारी अधिनियमातील कलम ६३ (१( (अ) (महाराष्ट्र सुधारणा) अन्वये निवृत्त भागीदारांच्या सहयाची आवश्यकता नसताना व तसा कायदा स्पष्टपणे अस्तित्वात असताना, निबंधक भागीदारी संस्था येथील अंमलबजावणी अधिकारी सदर आक्षेप काढीत असतात त्याबद्दल मागणी केलेली होती. "

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३०.६.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक, वांद्रे, मुंबई यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.३१.८.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-याकडे अपिलकाराने मागणी केलेली सर्व माहिती दिलेली असल्यामुळे अपिलकाराचे प्रथम अपील फेटाळण्यात आले. अपिलकाराने अपील अर्जासोबतच्या परिशिष्ट-१ मधील बाब क्र.२ ते ७ मधील समस्येसंबंधी अंमलबजावणी यंत्रणेकडे अर्ज करुन त्यांच्या समस्यांचे निराकरण करुन घ्यावे असे अपिलीय अधिका-यांनी आदेशात नमूद करुन आदेश पारित केले आहेत. सदर आदेशाने व्यथित होऊन

अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसते की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ च्या कलम ६३ (१) अन्वये अपिलकारास माहिती दिली आहे. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी समर्थन करुन, अपिलकाराने अपील अर्जात नमूद केलेल्या समस्येसंबंधी अंमलबजावणी यंत्रणेकडे अर्ज करुन त्यांच्या समस्यांचे निराकरण करुन घेण्याबाबत आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी पुरविलेल्या माहितीवरुन वस्तुस्थितीची माहिती अपिलकाराला झाली आहे. उक्त अधिनियमानुसार एखाद्या संस्थेच्या वा कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली माहितीच केवळ या अधिनियमाच्या तरतुदीनुसार माहिती मागणा-यास मागता येईल. अशा अभिलेखा वरील कागदपत्राची छाननी वा पाहणी करुन त्यावर निष्कर्ष काढून माहिती देणे अधिनियमाच्या तरतुदीत अभिप्रेत नसल्यामुळे प्रस्तुत अपिलात शासकीय माहिती अधिका-याने अपिलकाराला चुकीची माहिती दिली असे म्हणता येणार नाही. उपलब्ध झालेल्या माहितीवरुन एखाद्या अधिका-याची चूक अपिलकाराच्या लक्षात आली असेल वा शासकीय माहिती अधिका-याचा एखाद्या बाबीसंबंधीचा निष्कर्ष चुकीचा वाटत असेल तर त्यासंबंधात उक्त अधिनियमा व्यतिरिक्त इतर कायदयाच्या तरतुदीखाली वेगळी अशी योग्य ती कार्यवाही योग्य त्या प्राधिकरणाकडे करण्याचा मार्ग अपिलकाराला उपलब्ध आहेच हे स्पष्ट आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ अनुसार माहिती दिली आहे. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती अपिलकारास मान्य नसल्यास त्यांनी अंमलबजावणी यंत्रणेकडे संपर्क साधणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०१५/०२**

**श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**३९/२/३, नवजीवन हौसिंग सोसायटी,**
**इंदिरा नगर पोलीस चौकीसमोर, सर्विस रोड,**
**सांताक्रूझ (पूर्व.), मुंबई-४०० ०५५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/प. विभाग,**
**सेंट मार्टीन रोड, वांद्रे (प.) मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**वैद्यकीय अधिकारी (सार्व.आरोग्य खाते),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/प. विभाग,**
**सेंट मार्टीन रोड, वांद्रे (प.) मुंबई- ४०० ०५०.** **----- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/प. विभाग, वांद्रे (प.),मुंबई यांचेकडे दि. २२.६.२००७ च्या अर्जान्वये "टर्नर रोड, हिंदुस्तान पेट्रोलियम पेट्रोल पंपाच्या बाजूला, वांद्रे (प.), मुंबई-५० या ठिकाणी नवीनपणे उघडण्यात आलेले हॉटेल रॉयल चायना रेस्टॉरंट यांस आरोग्य खात्याने कोण कोणते परवाने व कोणती श्रेणी, कशाच्या आधारावर दिली व या परवान्या व श्रेणीकरिता सदर हॉटेल मालकाने जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयाकडे कोणकोणते अर्ज,, कोणकोणत्या कागदपत्रांसहित सादर केले होते, त्या अर्जासोबत हॉटेल मालकाने सादर केलेले कागदपत्र व त्या अनुषंगाने संबंधित हॉटेल मालकास दिलेले परवाने व श्रेणी संदर्भाच्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळण्याबाबम मागणी केली होती."

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यांकडे दि. ३०.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १६ ऑगस्ट, २००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, एच विभाग यांनी १५ दिवसांचे आत अपिलकारास माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३१.८.२००७ रोजी

आदेश पारित केले. सदर आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी दि.१२.११.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-योन विहित कालावधीत माहिती दिली नसल्याच्या कारणाने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि. २२.६.२००७ च्या अर्जान्वये जन माहिती अधिका-याकडे "टर्नर रोड, हिंदुस्तान पेट्रोलियम पेट्रोल पंपाच्या बाजूला, वांद्रे (प.), मुंबई-५० या ठिकाणी नवीनपणे उघडण्यात आलेले हॉटेल रॉयल चायना रेस्टॉरंट यांस आरोग्य खात्याने कोण कोणते परवाने व कोणती श्रेणी, कशाच्या आधारावर दिली व या परवान्या व श्रेणीकरिता सदर हॉलेट मालकाने जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयाकडे कोणकोणते अर्ज, कोणकोणत्या कागदपत्रांसहित सादर केले होते, त्या अर्जासोबत हॉटेल मालकाने सादर केलेले कागदपत्र व त्या अनुषंगाने संबंधित हॉटेल मालकास दिलेले परवाने व श्रेणी संदर्भाच्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळण्याबाबम मागणी केली होती." जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ३१.८.२००७ रोजी आदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी दोन महिन्याहून अधिक कालावधी उलटून गेल्यानंतर अपिलकारास दि.१२.११.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने त्यांचेविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यांत येऊ नये, याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून २० दिवसांच्या आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०११/०२**

**श्री. ग्रेग आर. परेरा,** **------ अपीलकर्ता**
**अे-७, रॉड्रीजस कंपाऊंड,**
**मालवणी व्हिलेज, मार्वे रोड,**
**मालाड (प.), मुंबई-४०० ०९५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मालाड (प.) मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक कर आकारणी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मालाड (प.) मुंबई- ४०० ०६४.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. ग्रेग आर.परेरा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक कर आकारणी, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग, मालाड, मुंबई यांचेकडे दि.२१.५.२००७ रोजी अर्ज करुन मालमत्ता क्र.पीएन-१४-१११२/२१६ ए/सी क्र.१४-३९३-००९ बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, मुंबई उपनगर यांनी अपिलकारास खालीलप्रमाणे माहिती दिली.

" मालवणीचे नगर भूमापनचे मालवणी भागातील जमिनीचा तुकडा अपिलकाराच्या वहिवाटील आहे. बटिका नंबरचा ताबा म्हणून जो नकाशा आहे त्यात जमिनीच्या तुकडयाचा नोंदणी क्र.६२६७ आहे व त्याचे क्षेत्रफळ ३५.९. चौ.मी. व त्याची लांबी रुंदी आकृतीत नमूद करुन माहिती दिली. त्यावर जमीन महसूल आकारलेला नाही. परंतु त्यावर वेळोवेळी जी रक्कम कायदेशिर रितीने आकारण्यात येईल ती रक्कम जमीन महसूल म्हणून यापुढे देण्यास ते पात्र राहिल असेही अपिलकारास कळविले. "

जन माहिती अधिका-यांनी मागितलेली माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, पी/उत्तर विभाग, मालाड, मुंबई यांचेकडे दि. १७.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.१७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक (क.व सं.खाते), पी/उत्तर विभाग, श्री.पाटील हे हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मालमत्ता क्र. .पीएन-१४-१११२/२१६ ए/सी क्र.१४-३९३-००९ बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे अनुषंगिक माहिती दिली नसल्याचा अपिलकाराचा मुख्य मुद्दा आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देता`की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास संबंधित फाईल तपासणीकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर अपिलकाराच्या मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास द्याव्यात.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०४५/०२**

**श्री. दिलीप भाऊसाहेब गायकवाड,** **------ अपीलकर्ता**
**१००/२, सिध्दार्थ विहार कंपाऊंड,**
**लोकमान्य टिळक रोड,वडाळा (प.), मुंबई-४०० ०३१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी**
**अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०.**

**जन माहिती अधिकारी तथा सब इंजिनियर,**
**अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. दिलीप भाऊसाहेब गायकवाड, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सब इंजिनियर, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि. २७.८.२००७ रोजी अर्ज करुन, क्र.एसआरए/ईएनजी/१६४/एफएन/एमएल/ण्लओआय, वडाळा व्हिलेज वेल्फेअर सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या मंजुरीच्या कागदपत्राच्या छायांकित प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी, अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि. २४.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

अपिलकाराने मागितलेल्या माहितीशी सुसंगत माहिती शुल्क रुपये २०८/- भरल्यानंतर उपलब्ध करुन देता येईल. शुल्क भरल्यानंतर आठ दिवसांच्या आत अपिलकारास, जन माहिती अधिका-यांनी माहिती द्यावी असे दि.६.११.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्राच्या फक्त ६१ प्रती कव्हरिंग पत्राशिवाय अधिक शुल्क आकारुन दिल्या. मूळ कागदपत्राची पहाणी करण्यास संबंधित फाईल (झोपडपट्टी सुधार प्राधिकरण) अपिलकारास दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन

अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १६.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने क्र. एसआरए/ ईएनजी/ १६४/एफएन/एमएल/ण्लओआय, वडाळा व्हिलेज वेल्फेअर सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या मंजुरीच्या कागदपत्राच्या छायांकित प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी फक्त ६१ पत्राच्या प्रती दिल्या. एसआरएच्या संबंधित फाईलची अपिलकारास पहाणी करण्यास दिली नाही असा अपिलकाराचा मुद्दा दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी, अपिलकारास संबंधित फाईल तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर मागणीप्रमाणे अपिलकारास उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत द्याव्यात.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९८९/०२**

**श्री. वोरा महेश जयंतीलाल,** **------ अपीलकर्ता**
**३०१, सुरुची, मित्तल कॉलेजजवळ,**
**बंदरवाडा, मालाड (प.), मुंबई-४०० ०६४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता, (इमारती व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. वोरा महेश जयंतीलाल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नार्थ विभाग, मालाड, मुंबई यांचेकडे दि. २२.५.२००७ रोजी अर्ज करुन, क्र.एसीपीएन/बीएफ-१/४८८/५३१ ही सुरुची सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीची पहाणी करण्याबाबत अपिलकाराच्या तक्रारीवरुन नोटीस काढली. याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. ३०.७.२००७ रोजी माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, पी/नार्थ विभाग, मालाड, मुंबई यांचेकडे दि. ७.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपिलावर दि. ४.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार व जन माहिती अधिकारी हजर होते. उपलब्ध कागदपत्रावरुन आवश्यक ती माहिती १५ दिवसांचे आत अपिलकारास द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ८.१०.२००७ रोजी जन माहिती

अधिका-यांना आदेश दिले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही जन माहिती अधिका-याने अपिलकारास माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता युपीसीने पत्र पाठवूनही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने सुरुची गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी/ कर्मचा-यांनी पहाणी केली होती. त्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली. जन माहिती अधिका-यांनी दि. ३०.७.२००७ च्या पत्रान्वये अपूर्ण माहिती दिली. त्यामुळे अपिलकाराने मागितलेली अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ८.१०.२००७ रोजी ाअदेश पारित करुन, जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या. परंतु, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नाही. सदर बाब निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये जन माहिती अधिका-यांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९७९/०२**

**श्री.मच्छिंद्र एन.कारळकर,** **------ अपीलकर्ता**
**हजाराबाई हाऊस, रुम नं.५,**
**ईर्ला सोसायटी रोड,**
**विलेपार्ले (प.), मुंबई-४०० ०५६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/वेस्ट विभाग,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता, (इमारती व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/वेस्ट विभाग,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. मच्छिंद्र एन.कारळकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ८.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई यांचेकडे दि. २१.८.२००७ रोजी अर्ज करुन, खालील माहिती मागितली होती.

"ईर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथील सक्तीच्या मोकळया जागेवरील खाद्यपदार्थ विक्रीच्या दुकानाची नावे व इतर अनुषंगिक एकूण ८ मुद्दयांवर माहिती मागितली होती." जन माहिती अधिका-यांनी मुद्दा क्र.१ व २ बाबतची अपिलकारास माहिती दिली. मुद्दा क्र. ३, ४ व ५ बाबत आवश्यक रक्कम शुल्कापोटी भरल्यानंतर माहिती देण्याची तयारी दर्शविली. मुद्दा क्र.६ व ७ ची माहिती सहाय्यक अभियंता (इ.व का.) , के/पश्चिम विभाग यांचेशी संबंधित, मुद्दा क्र. ८, वरिष्ठ निरीक्षक (परवाने), के/पश्चिम विभाग यांचेशी संबंधित असल्याचे दि. २६.९.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, के/पश्चिम विभाग यांनी दिशाभूल करणारी माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे दि.८.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि. २२.१०.२००७ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले. " जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारती व कारखाने) आणि जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (परवानरे) यांनी अपिलकारास अर्जातील मुद्दा क्र.६, ७ च ८ बाबत १० दिवसांचे आंत माहिती द्यावी अशा सूचना दिल्या. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास अपिलकारास माहिती देण्याबाबत दि.२२.१०.२००७ रोजी आदेश देऊनही दोन्ही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता यु.पी.सी.ने पत्र पाठवूनही जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (प.) मुंबई येथील सक्तीच्या मोकळया जागेवरील खाद्यपदार्थ विक्रीच्या दुकानाची नावे व इतर अनुषंगिक एकूण ८ मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपिलकाराच्या अर्जातील मुद्दा क्र.६, ७ व ८ बाबत अपिलकारास माहिती देणेबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी सूचना देऊनही जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) आणि जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (परवाने) यांनी अपिलकारास माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमजबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास माहिती द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत १५ दिवसांचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९८८/०२**

**श्री. जगदीश देवराम टोरपे,** **------ अपीलकर्ता**
**२५-अे, टोरपे हाऊस, पहिला मजला,**
**फ्लॅट क्र.२, तेजपाल स्कीम, ५ वा रस्ता,**
**विलेपार्ले (पूर्व), मुंबई- ४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे,**
**के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे,**
**के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. जगदीश देवराम टोरपे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई यांच्याकडे दिनांक २७.८.२००७ रोजी अर्ज करुन, सीटी सर्व्हे क्र.४५६ (१-७) विलेपार्ले (पूर्व), मुंबई, फाईल क्र.सीई/७०६४/डब्लूएस/एके, पार्ले स्मृती सहकारी गृहनिर्माण संस्थेसंबंधीची मालकी हक्का संबंधीची करारपत्र दि. २३.१२.१९७९, २.६.१९८०, २१.४.१९९३ च्या प्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई यांच्याकडे दिनांक २७.८.२००७ रोजी अर्ज करुन, सीटी सर्व्हे क्र.४५६ (१-७) विलेपार्ले (पूर्व), मुंबई, फाईल क्र.सीई/७०६४/डब्लूएस/एके, पार्ले स्मृती सहकारी गृहनिर्माण संस्थेसंबंधीची मालकी हक्का संबंधीची करारपत्र दि. २३.१२.१९७९, २.६.१९८०, २१.४.१९९३ च्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१००२/०२**

**श्री. मोईन अखतर कुरेशी,** **------ अपीलकर्ता**
**बैतुल अक्तर बिल्डिंग, १ ला मजला,**
**रुम नं.१८/१९, दिल्ली दरबार हॉटेलच्यावर,**
**पट्टे बापूराव मार्ग, मुंबई- ४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग,चंदनवाडी,**
**मरीनलाईन्स, मुंबई- ४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग,चंदनवाडी,**
**मरीनलाईन्स, मुंबई- ४०० ००२.** **------- उत्तरवादी**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. मोईन अखतर कुरेशी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड, मरीनलाईन्स, मुंबई यांच्याकडे दि.९.४.२००७ रोजी अर्ज करुन, सी विभागात दि.१ जानेवारी,२००३ ते १ जानेवारी,२००७ या कालावधीत इमारती विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी, वकीलांनी दिलेल्या नोटीसा, तक्रारदारांना दिलेली उत्तरे यासंबंधीची सहपत्रासह संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत अपिलकाराने मागणी केली होती.

अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता जवळ जवळ ५०,०००/- झेरॉक्स प्रती होणार असून, या कामाकरिता प्रमाणाबाहेर मनुष्यबळाची आवश्यकता लागणार आहे. याकरिता कार्यालयात एवढे मनुष्यबळ उपलब्ध नाही. दैनंदिन कामकाजावर परिणाम होईल. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जमा करण्याकरिता अंदाजे रु.१.०० लाख खर्च येईल. सदर माहिती जमा करण्यास विलंब लागेल. इ.कारणा वरुन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती नाकारली.

यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी, तथा सहायक आयुक्त, सी विभाग, मनपा, मुंबई यांच्याकडे दि. २१.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीची नोटीस युपीसीने पाठवूनही सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड, मरीनलाईन्स, मुंबई यांच्याकडे दि.९.४.२००७ रोजी अर्ज करुन, सी विभागात दि.१ जानेवारी,२००३ ते १ जानेवारी,२००७ या कालावधीत इमारती विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी, वकीलांनी दिलेल्या नोटीसा, तक्रारदारांना दिलेली उत्तरे यासंबंधीची सहपत्रासह संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात असल्याने जन माहिती अधिका-याने माहिती नाकारली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-याने अपिलकारास संबंधित कागदपत्राची तपासणी करण्यास परवानगी द्यावी. त्यानंतर आवश्यक तेवढयाच कागदपत्राच्या छायाप्रती विहित शुल्क आकारुन अपिलकारास उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०१९/०२**

**श्रीमती आयेशा अनीस शेख,** **------ अपीलकर्ता**
**प्लॉट नं.४३, उत्कर्ष सोसायटी समोर,**
**रोड नं.५, शिवाजीनगर,**
**गोवंडी, मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप आयुक्त (सा.प्र.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ६ वा मजला,**
**एम.सी.जी.एम.महापालिका मार्ग,**
**मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ६ वा मजला,**
**एम.सी.जी.एम.महापालिका मार्ग,**
**मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. आयेशा अनिस शेख, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे दि.१९.९.२००७ रोजी अर्ज करुन, श्रीमती अंजुम फातिमा, नगरसेविका, वॉर्ड क्र.१३० यांनी महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून तीन महिन्याच्या आत जाती वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. असे असताना त्यांना मनपाच्या कोणत्या अधिनियमानुसार नगरसेविका पदावर कार्यरत ठेवण्यात आले याबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.१०.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहितीने समाधान झ ाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, यांच्याकडे दि.५.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी करिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. जन माहिती अधिका-याने अपिलकारास विहित कालावधीत आवश्यक ती माहिती दिली असल्याचे निदर्शनास आल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपीलावर दि.२३.११.२००७ रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळले.

मागितलेली माहिती मिळाली नसल्याने प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे दि.१९.९.२००७ रोजी अर्ज करुन, श्रीमती अंजुम फातिमा, नगरसेविका, वॉर्ड क्र.१३० यांनी महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून तीन महिन्याच्या आत जाती वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. असे असताना त्यांना मनपाच्या कोणत्या अधिनियमानुसार नगरसेविका पदावर कार्यरत ठेवण्यात आले याबाबत माहिती मागितली होती. श्रीमती अंजुम फातिमा, नगरसेविका यांचा इतर मागासवर्ग जातीचा दावा विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविला असल्यामुळे, श्रीमती अंजुम फातिमा यांनी मा.उच्च न्यायालयात, बृहन्मुंबई महानगरपालिका विरुध्द रिट पिटीशन क्र.४४३७ दाखल केले होते. विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने दि. ३०.५.२००७ रोजी श्रीमती अंजुम फातिमा यांचा जाती दावा अवैध ठरविला. सदर आदेश मा. उच्च न्यायालयाने दि. ११ जुलै,२००७ रोजी रद्दबातल केले. तसेच, श्रीमती अंजुम फातिमा यांच्या जातीदाव्याचा आवश्यक कागदपत्राच्या आधारे पुर्नविचार करुन कायदयातील तरतुदीनुसार तपासून द्यावा असे आदेश दिले. यासंबंधीची कागदपत्रे आवश्यक शुल्क भरुन कार्यालयातून उपलब्ध करुन घेण्याबाबत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले असल्याचे दि.१५.१०.२००७ च्या पत्रावरुन दिसून येते. श्रीमती अंजुम फातिमा यांचा इतर मागासवर्ग प्रवर्गाचा जातीदावा मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने पुर्नविचार करुन काय आदेश पारित केले याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नसल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, श्रीमती अंजुम फातिमा यांच्या इतर मागासवर्ग जाती दाव्याबाबत विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती/ मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची माहिती जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्तझाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपिलकारास माहिती दयावी.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०८१/०२**

**श्री. एडविन डिसोझा,** **------ अपीलकर्ता**
**सी-१०८, वर्सोवा ज्युपिटर को.ऑप.हॉ.सो.लि.**
**लोखंडवाला कॉम्प्लेक्स, ४ था क्रॉस रोड,**
**अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०५३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,**
**विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुबई,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक,**
**विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुबई,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. एडविन डिसोझा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था मुंबई विभाग, मुंबई यांच्याकडे दि.२५.१०.२००७ रोजी अर्ज करुन, अपील क्र.११३/०६ बाबतची माहिती तसेच प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय सह निबंधक यांचे नांव, पत्ता इ.बाबतची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१७.११.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई यांचेकडे दि.३.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१७.१२.२००७ व दि.२७.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली होती. जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते. अपिलकाराने त्यांचे लेखी म्हणणे सादर केले. त्यामध्ये अपिलकाराने माहितीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहिती व्यतिरिक्त अतिरिक्त माहिती मागितली होती. याकरिता स्वतंत्र अर्ज सादर करुन माहितीची मागणी करावी असे नमूद करुन, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकाराचे प्रथम अपील फेटाळले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे अपील क्र.११३/०६ बाबतची माहिती तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तसेच विभागीय सह निबंधक यांचे नांव, पत्ता व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१७.११.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी युक्तिवाद केला. अपिलकार प्रथम अपिलाच्या सुनावणीचेवेळी हजर नव्हते. परंतु त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले होते. लेखी म्हणण्या नुसार अपिलकाराने अतिरिक्त माहिती मागितली असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांच्या निदर्शनास आले. अतिरिक्त माहितीसाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन माहिती मागणे आवश्यक असल्याचे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपील फेटाळण्यात आले असल्याबाबत आदेश पारित केले. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक माहिती दिली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०२२/०२**

**श्री. अशोक हिरजी छेडा,** **------ अपीलकर्ता**
**अशोक स्टोअर्स, शॉप नं.१० (ओ.एस.)**
**बी.आर.गावडे मार्केट,**
**वरळी नाका, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त (मार्केट),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, म.ज्योतीबा फुले मंडई,**
**डी.एन.रोड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अधिक्षक (मार्केट),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, म.ज्योतीबा फुले मंडई,**
**डी.एन.रोड, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. अशोक हिरजी छेडा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक (बाजार) बृहन्मुंबई महानगरपालिका, एम.जे.फुले मार्केट, मुंबई यांचेकडे दि.५.६.२००७ रोजी अर्ज करुन, बी.आर.गावडे महापालिका मार्केट वरळी नाका, मुंबईच्या पुर्नविकासासंबंधी दि.१७.१०.२००६ रोजी सादर केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम २ (१) खाली मोडत नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराचा अर्ज निकालात काढल्याचे दि.२८.८.२००७ रोजी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले.

जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त (बाजार), बृहन्मुंबई महानगरपालिका, एम.जे.फुले मार्केट, मुंबई यांचेकडे दि.२२.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराच्या दि.१७.१०.२००६ च्या तक्रार अर्जासंबंधी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.९.२००७ च्या पत्रान्वये उत्तर दिले. तसेच दि.२०.१२.१९८६ च्या परिपत्रकाची टंकलिखित प्रत दिली असल्याने नमूद करुन, जन माहिती अधिका-यांनी माहितीच्या अधिकारातील अर्जावर केलेल्या कार्यवाहीचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२१.९.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशाने समाधान झाले नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.१०.०८ रोजी सुनावणी

आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१७.१०.२००६ रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. सदर तक्रार अर्जास दि.२१.९.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी दत्तर दिले. दि.२०.१२.१९८६ च्या परिपत्रकाची टंकलिखित प्रत दिली. सदर परिपत्रकातील संदर्भाधीन कागदपत्राच्या प्रती कार्यालयात शोध घेऊनही उपलब्ध झाल्या नसल्याचे कळविले. दि.२०.१२.१९८६ चे परिपत्रक वाचनीय नसल्याने अपिलकाराच्या विनंतीनुसार ते टंकलिखित करुन दिले. परिपत्रक टंकलिखित केलेले आहे म्हणून ते अवैध होत नाही. बी.आर. गावडे मार्केटच्या पुनर्विकासाकरिता पात्र लायसन्स धारकांची तयार करण्यात आलेली परिशिष्ट-II ची यादी रद्द करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असेही अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराच्या तक्रारीवर माहिती दिली असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराच्या माहितीच्या अधिकारातील दि.५.६.२००७ च्या अर्जास, अपिलकाराने मागितलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम २ (१) मध्ये मोडत नसल्याचे कळविले. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराच्या दि.५.६.२००७ च्या अर्जास दि.२०.८.२००७ च्या पत्रान्वये विलंबाने उत्तर दिले असल्याचे दिसते. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी, अशी जन माहिती अधिका-यांना समज देण्यांत येत आहे.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०६८/०२**

**श्री. अनंत जी. सोंडे,** **------ अपीलकर्ता**
**अंबर प्रसाद को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**तळमजला, अ ब्लॉक, फ्लॅट नं.२३,**
**बांद्रा रिक्लमेशन, जनरल अे.के.वैद्य मार्ग,**
**वांद्रे (प.) मुंबई- ४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/ वेस्ट वॉर्ड,**
**सेंट मार्टीन्स रोड, वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय**
**सहायक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/ वेस्ट वॉर्ड,**
**सेंट मार्टीन्स रोड, वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. अनंत जी, सोंडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.) एच/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे दि.४.१२.२००६ रोजी अर्ज करुन, अंबर प्रसाद सहकारी गृहनिर्माण संस्था लि. जनरल अे.के.वैद्य मार्ग, वांद्रे, मुंबई येथे श्री.व्ही.एल. समुद्र, सी ब्लॉक, तळमजला यांनी अनधिकृतपणे मनपाची परवानगी न घेता ओटा बांधला आहे. मनपाच्या परवानगीशिवाय चरकक्षेत्राचा (एफ.एस.आय.) वापर करीत आहेत. एच विभागातील सहाय्यक अभियंता सदर अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही करीत नाहीत. अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्याबाबत जे अधिकारी/ कर्मचारी कारवाई करीत नाहीत याबाबत माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम २ (एफ आणि जे) अंतर्गत मोडत नाही. यामुळे माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि. २.१.२००७ च्या पत्रान्वये कळविले.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांचेकडे दि.२७.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१५.३.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. जोडपत्र-एक प्रमाणे अपिलकाराने मागितलेली अनधिकृत

बांधकामाबाबतची माहिती १५ दिवसांचे आत अपिलकारास द्यावी असे दि.२०.३.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. सदर आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अंबर प्रसाद सहकारी गृहनिर्माण संस्था लि. जनरल अे.के.वैद्य मार्ग, वांद्रे, मुंबई येथे श्री.व्ही.एल. समुद्र, सी ब्लॉक, तळमजला यांनी अनधिकृतपणे मनपाची परवानगी न घेता ओटा बांधला आहे. याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम २ (जे) खाली येत नाही. श्री. व्ही.एल.समुद्र यांनी सादर केलेला अर्ज, महानगरपालिकेने दिलेल्या परवानगीच्या आदेशाची प्रत शुल्क भरुन देण्याची तयारी दर्शविली. तसेच अपिलकारास संबंधित फाईलची तपासणी करण्यास परवानगी देऊन, त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्राच्या छायाप्रती शुल्क आकारुन देण्यात येतील असे दि. २.७.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी कळविले. श्री. व्ही.एल. समुद्र यांनी ओटयाच्या बांधकामाकरिता सादर केलेल्या नकाशाची तसेच अर्जाची प्रत, मनपाने ओटा बांधकामासाठी दिलेल्या परवान्याची प्रत अपिलकारास मिळाली नसल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-यांविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०६०/०२**

**डॉं. मनोहर भिकाजी रावते, ------ अपीलकर्ता**
**अे-१९, सांगली वैभव को.ऑप.हौ.सो.लि.**
**५, नटवर नगर,जोगेश्वरी (प.),मुंबई- ४०० ०६०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३),**
**म्हाडा, रुम नं.६९, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक सहकारी संस्था, ई वॉर्ड**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जीपीओ समोर, मुंबई- ४०० ००१. ------- उत्तरवादी**

**- विवेचन -**

अपिलकार डॉ. मनोहर भिकाजी रावते, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, के/पूर्व विभाग, मुंबई यांचेकडे दि. ४.९.२००७ रोजी अर्ज करुन, सांगली वैभव को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. नटवरनगर, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई या संस्थेसंबंधीची अनुषंगिक कागदपत्राची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३), म्हाडा, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.२९.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि. २७.११.२००७ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले.

" अपिलकार डॉ.एम.बी.रावते, यांनी माहितीचा अधिकार अधिकनयम, २००५ अन्वये विहित नमुन्यात जन माहिती अधिका-याकडे माहितीची मागणी केलेली नव्हती. पत्रान्वये माहितीबाबत विचारणा केली. सदरहू पत्राच्या अनुषंगाने जन माहिती अधिका-यांनी दि. ३.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास उत्तर दिले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराच्या दि. ४.९.२००७ च्या अर्जास सविस्तर उत्तर द्यावे असे नमूद करुन प्रथम अपील फेटाळले. "

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपाासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि. ४.९.२००७ च्या अर्जान्वये सांगली वैभव को.ऑप.हौसिंग सोसा,लि. या संस्थेसंबंधीची कागदपत्राची मागणी केली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविले. अपिलकाराच्या दि.४.९.२००७ च्या पत्रास सविस्तर उत्तर द्यावे असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२७.११.२००७ रोजी आदेश पारित केले. सांगली वैभव सहकारी गृहनिर्माण संस्थेने अपिलकाराविरुध्द दाखल केलेल्या प्रकरणास श्री. राजेश कुलकर्णी, उपनिबंधक सहकारी गृहनिर्माण संस्था, के/ई विभाग यांनी क्रमांक दिला नाही हा मुख्य मुद्दा आहे. यामुळे रोजनाम्याची प्रत, जावक नोंदवहीची प्रत, तसेच श्री. कुलकर्णी यांनी प्रकरणास क्रमांक दिला नसल्याने त्यांच्याविरुध्द तक्रार आहे. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नसल्याचे दिसते. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी, श्री.राजेश कुलकर्णी यांचेविरुध्द अपिलकाराची तक्रार असल्याने या प्रकरणी अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधी वरिष्ठ स्तरावरुन कार्यालयातील अभिलेखाची तपासणी करुन अपिलकारास माहिती देणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जिल्हा उपनिबंधकांनी अभिलेखाची तपासणी करुन हे आदेश प्राप्त झाल्या पासून १५ दिवसाचे आत अपिलकारास माहिती द्यावी. सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल आयोगास सादर करावा.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०६१/०२**

**डॉ. मनोहर भिकाजी रावते, ------ अपीलकर्ता**
**अे-१९, सांगली वैभव को.ऑप.हौ.सो.लि.**
**५, नटवर नगर,जोगेश्वरी (प.),मुंबई- ४०० ०६०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**झोन-II, (साऊथ), सर जे.जे.मार्ग,**
**नागपाडा, मुंबई- ४०० ०२७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**साऊथ डिव्हीजनल ऑफीस,**
**नागपाडा, मुंबई- ४०० ०२७. ------- उत्तरवादी**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार डॉ. मनोहर भिकाजी रावते, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, मुंबई यांचेकडे दि. ५.९.२००७ रोजी अर्ज करुन, माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक, श्री.शंकरराव येसरे यांनी मा.३३ वे न्यायालय, बॅलार्ड पिअर कोर्ट यांच्या न्यायालयात सादर केलेल्या आय ॲन्ड आर क्र.०५/९९ मिसलेनियस प्रकरण क्र.१४१/९६ या कागदपत्रातील स्पष्टीकरणाच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, झोन-II, मुंबई यांचेकडे दि.३.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

अपिलकारास अर्जानुसार मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती द्यावी असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१७.११.२००७ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती देण्याबाबत आदेश पारित करुनही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलीकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलीतील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक, श्री.शंकरराव येसरे यांनी मा.३३ वे न्यायालय, बॅलार्ड पिअर कोर्ट यांच्या न्यायालयात सादर केलेल्या आय ॲन्ड आर क्र.०५/९९ मिसलेनियस प्रकरण क्र.१४१/९६ या कागदपत्रातील स्पष्टीकरणाच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती. मा.३३ वे न्यायालय, बॅलार्ड पिअर यांचे न्यायालयातून प्रथम अपिलीय अधिका-यांनी कागदपत्र मागवून घेतली असता अपिलकाराने मागणी केलेली माहिती अभिलेखावर मिळाली नाही. अर्ज शाखा, कक्ष-१२ या शाखेचे सन २००५ पर्यंतचे सर्व अभिलेख लागलेल्या आगीमध्ये नष्ट झालेले असल्याने अभिलेख उपलब्ध नसल्याचे दि.१०.१.२००८ च्या पत्रानुसार तत्कालिन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. प्रशासकीय अधिकारी, कक्ष-१२, अर्ज शाखा पोलीस आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयाकडून अभिलेख नष्ट झाल्याबाबत सादर केलेले पत्र व शॉर्ट सर्कीट होऊन लागलेल्या आगीबाबत पोलीस आयुक्तालय येथे ठाणे दैनंदिनीत नोंद घेण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी लेखी अहवाल सादर करुन युक्तिवाद केला. या परिस्थितीत अपिलकारास मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही हे दिसून येते.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१००३/०२**

**श्री.मोईन अखतर कुरेशी,** **------ अपीलकर्ता**
**बैतुल अखतर बिल्डिंग, १ ला मजला,**
**रुम नं.१८/१९, दिल्ली दरबार हॉटेलच्यावर,**
**पट्टे बापूराव मार्ग, मुंबई- ४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग,**
**चंदनवाडी, मुंबई- ४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग,**
**चंदनवाडी, मुंबई- ४०० ००२** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. मोईन अखतर कुरेशी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), सी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, चंदनवाडी, मुंबई यांचेकडे दि.२.४.२००७ रोजी अर्ज करुन, सन २००१ ते २००७ या कालावधीतील सी विभागातील मनपा अधिनियमातील कलम ३५४-ए अन्वये दिलेल्या नोटीसाच्या प्रती तसेच त्यानुसार तोडून टाकण्याबाबत काढण्यात आलेल्या आदेशाच्या प्रतीची मागणी केली होती.

अपिलकाराने मागितलेल्या माहितीचे स्वरुप मोठे असून, ५००० प्रती होण्याची शक्यता असल्याने माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता प्रमाणाबाहेर मनुष्यबळ लागणार. तेवढे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने उक्त अधिनियमातील कलम ७ (ए) नुसार जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, चंदनवाडी, मुंबई यांचेकडे दि.२१.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य

माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता यु.पी.सी.ने नोटीस पाठवूनही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने बृहन्मुंबई महानगरपालिका सी विभागात सन २००१ ते २००७ या कालावधीतील सी विभागातील मनपा अधिनियमातील कलम ३५४-ए अन्वये दिलेल्या नोटीसाच्या प्रती तसेच त्यानुसार तोडून टाकण्याबाबत काढण्यात आलेल्या अंतीम आदेशाच्या प्रतीची मागणी केली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता प्रमाणाबाहेर मनुष्यबळ लागणार असल्याने व तेवढे मनुष्यबळ कार्यालयात उपलब्ध नाही. कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर परिणाम होईल. यामुळे उक्त अधिनियमातील कलम ७ (ए) अन्वये जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली माहिती देणे सोईचे व्हावे म्हणून जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित फाईलची पहाणी करण्यास परवानगी द्यावी. त्यानंतर अपिलकाराच्या मागणीनुसार उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रतील विहित शुल्क आकारुन उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०८५/०२**

**श्री. आर.ए.गायकवाड,** **------ अपीलकर्ता**
**एक्सप्रेस न्युजपेपर आणि मॅगझिन्स सर्व्हिस,**
**वृंदावन, अंधेरी रेल्वे पोलीस स्टेशन समोर,**
**नवीन रेल्वे स्टेशन,अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सह प्रकल्प संचालक,.**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. आर.ए.गायकवाड, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सह प्रकल्प संचालक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि. १३.८.२००७ रोजी अर्ज करुन, त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. १२.९.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि. १४.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ५.१२.२००७ रोजी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, मरोळ नाका, पाईप लाईन, अंधेरी (पूर्व), नकाशा क्र.४, दक्षिण येथील रस्ता रुंदीकरणात अपिलकाराचा १५x१० चा पक्का एक अनिवासी गाळा निष्कासित करण्यात आला. रस्ता रुंदीकरणाला बाधित होणा-या झोपडींची पात्रता तपासून परिशिष्ट -II ची यादी तयार करण्यात आली. त्यामध्ये श्री.रंगनाथ गायकवाड, आय.डी.क्र.९३ , नकाशा क्र.४, दक्षिण, मरोळ पाईपलाईन यांना पात्र केले. त्यांच्या नावे टाटानगर, मानखुर्द येथे इमारत क्र.७ बी मधील अनिवासी सदनिका क्र.१७ चे दि. ४.५.२००६ रोजी वितरण आदेश देण्यात आले.

वास्तव्य असलेल्या ठिकाणीच आजूबाजूला पुनर्वसन करणेबाबत अपिलकाराने दि.४.७.२००७ व ९.७.२००७ च्या अर्जान्वये विनंती केली होती. परंतु अपिलकाराने मागणी केलेल्या ठिकाणी पुनर्वसन वसाहत नसल्याने अपिलकारास वितरित केलेला टाटानगर, मानखुर्द येथील अनिवासी गाळा बदलून पुनमनगर, जोगेश्वरी येथील इमारत क्र. पीआर-२ मध्ये अनिवासी गाळा क्र.१४-ए वितरित करण्यात आला. अपिलकाराने अनिवासी गाळयाचा अद्याप ताबा घेतलेला नाही.

अपिलकार यांनी पूर्वीच्या जागीच व्यवसाय करु देण्याची मागणी केली. अपिलकाराचे रस्ता रुंदीकरणामध्ये निष्कासित केलेल्या बांधकामाचे पुनर्वसन त्याच ठिकाणी पुन्हा करता येत नाही. कारण त्यामुळे वाहतुकीवर परिणाम होऊ शकतो असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास सर्वतोपरी माहिती दिली असल्याचे सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन युक्तिवाद केला. याबाबत जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक व नियमानुसार कार्यवाही केली असल्याचे दिसून येते. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०८०/०२**

**श्री. सफिउल्ला हवालदार खान, ------ अपीलकर्ता**
**११६, न्यू धोबीघाट रजक सोसायटी,**
**कॅप्टन प्रकाश पेठे मार्ग, कफ परेड,**
**कुलाबा, मुंबई-४०० ००५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२,**
**सर जे.जे.मार्ग, नागपाडा, मुंबई- ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई. ------ उत्तरवादी**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. सफिउल्ला हवालदार खान, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई, यांच्याकडे दि.२१.७.२००७ रोजी ४ अर्ज करुन, सन १९९४ ते २००७ आणि सन १९९० ते २००७ या कालावधीची पुढील माहिती मागितली होती.

(१) श्री. पुरण मोहनलाल डोशी, श्री. शिवाजी शंकर जाधव
(२) श्री. गुलाम रसुलखान, श्री. धनंजय उपेन्दर यादव
(३) श्री. मेहबूब इनायत खान, माहिम, श्री. साजिक अब्दूल रसीद कुरेशी
(४) श्री. रोहिदास जनार्दन कोळी, श्री. सफीउल्ला हवालदार खान (स्वतः अपिलकार)

वरील सर्व इसमांविरुध्द कुलाबा पोलीस ठाणे व व कफपरेड पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या दखलपात्र व अदखलपात्र, निर्दोष मुक्त गुन्हे यांच्यावर झालेली प्रतिबंधात्क कारवाईबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास वर नमूद माहिती दि. २७.७.२००७ च्या स्वतंत्र चार पत्रांन्वये उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिका-यांनी चुकीची माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ८.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर

होते. सहाय्यक माहिती आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलकाराने मागितलेली प्राप्त गुन्हे अभिलेखावरील माहिती त्यांना देण्यांत आली. परंतु माहिती चुकीची दिली असे अपिलकाराने प्रथम अपिलात म्हटले. अपिलकारास कोणती चुकीची माहिती पुरविण्यांत आली, कोणती माहिती त्यांना हवी आहे, याबाबत अपिलकार समर्थन देण्यास असमर्थ ठरल्याने प्रथम अपील दि. ११.१०.२००७ रोजी फेटाळले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनीही अपूर्ण माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी व त्यांचे इतर तीन अधिकारी तसेच अपिलकाराच्या वतीने त्यांचे वकील, श्री. आर.एस.त्रिपाठी हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन माहिती अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिका-यांकडे दि.२१.७.२००७ रोजी चार अर्ज करुन, अपिलकार स्वतः व इतर ७ व्यक्तिंविरुध्द सन १९९४ ते २००७ आणि सन १९९० ते २००७ या कालावधीत कुलाबा पोलीस ठाणे व कफपरेड पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या दखलपात्र, अदखलपात्र, निर्दोष मुक्त गुन्हे व त्यांच्यावर झालेली प्रतिबंधात्मक कारवाईबाबत माहिती मागितली होती. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची तपासणी केली असता स्वतः अपिलकार व इतर ७ व्यक्तिंविरुध्द पोलीस ठाण्यातील गुन्हा नोंदीबाबत सविस्तर माहिती जन माहिती अधिका-यांनी दि. २७.७.२००७ च्या स्वतंत्र चार पत्रांन्वये दिली असल्याचे दिसून आले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार माहिती दिली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी घेतलेल्या निर्णयात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०७६/०२**

**श्री. बी. एस. रथ,** **------ अपीलकर्ता**
**४-बी, गणेश भवन,**
**४३४, सेनापती बापट मार्ग,**
**माहीम, मुंबई-४०० ०१६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, मुंबई शहर,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी सस्था, जी/एन विभाग, मुंबई.** **------ उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. बी. एस. रथ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई, यांच्याकडे दि.२०.६.२००७ रोजी अर्ज करुन जयगणेश सहकारी गृहनिर्माण संस्थेने दि. १८.५.२००७ रोजी दिलेले पत्र व त्यासंदर्भात अपिलकाराने दि.३१.५.२००७ रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीसंबंधी एकूण ७ मुद्दयांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. १७.७.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास मुद्देनिहाय माहिती दिली.

जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती अप्रासंगिक असल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई शहर, मुंबई यांचेकडे दि. १०.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. जयगणेश सहकारी गृहनिर्माण संस्थेचे माजी सचिव, श्री. डी.जे.हरजानी यांचेकडे संस्थेची थकबाकी रु.३,६२,६८८/- एवढी असताना त्यांनी फ्लॅट क्र. १६ विक्रीस काढलेला आहे. त्यांचेकडील थकबाकी वसूल झाल्याशिवाय फ्लॅट विकता येणार नाही असे अपिलकाराचे म्हणणे आहे. याबाबत संस्थेची तपासणी घेऊन खात्री करुन सविस्तर कार्यवाही करावी. अपिलकारास माहिती द्यावी. असे प्रथम अपिलीस अधिका-यांनी, जन माहिती अधिकारी यांना आदेश दिले.

जन माहिती अधिका-यांनी, प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन अपिलकारास दि. ६.९.२००७ रोजी दिली. अर्जातील मुद्दा क्र.इ, एफ, जी. बाबत अपिलकारास माहिती मिळाली नाही. अपिलकार संस्थेच्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत तक्रार करीत आहेत. संस्थेची कलम ८९ (अे) अन्वये तपासणी घेणे आवश्यक असल्याने उपनिबंधक, सहकारी संस्था, जी-एन विभाग, मुंबई यांनी संस्थेची तपासणी घेऊन अपिलकारास त्याबाबतचा अहवाल दयावा असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. तथापि, जन माहिती अधिका-यांनी संस्थेची तपासणी करुन अद्याप अपिलकारास अहवाल सादर केल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत जन माहिती अधिका-यांना मी असे आदेश देतो की, सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास संस्थेच्या तपासणीचा अहवाल द्यावा.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०७५/०२**

**श्री. बद्रिप्रसाद मुरलीधर मिस्त्री,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा-कृष्णा स्टोन ट्रेडर्स,**
**प्लॉट नं.१७१-१७२, प्रभात कॉलनी,**
**सर्विस रोड, हायवे जवळ,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सह प्रकल्प संचालक (पुनर्वसन/पुनर्वसाहत)**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप जिल्हाधिकारी (पुनर्वसाहत),**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.** **------ उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. बद्रिप्रसाद मुरलीधर मिस्त्री, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, पश्चिम द्रूतगती महामार्ग, पॅकेज क्र.२, प्रभात कॉलनी, सर्विस रोड, सांताक्रूझ येथील रस्ता रुंदीकरणातील अपिलकाराची जागा स्वत: निष्कासित केल्याचे कळविले होते. तसेच दुरुस्ती करण्यास परवानगी, निष्कासनाचा व लाभ प्रदानाचा दाखला मिळणेबाबत मागणी केली होती. सदर दाखला देण्याची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कार्यकारी अभिंयंता व उप अभियंता यांची असल्याने अपिलकाराने त्यांच्या झोपडी संदर्भातील परिशिष्ट-२ त्यावेळचे तत्कालिन कार्यकारी अभियंता, श्री.पवार यांचेकडे दि.१७.९.२००७ रोजी अपिलकाराचा अर्ज पाठविला. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह प्रकल्प संचालक (पुनर्वसन/ पुनर्वसाहत), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,

वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.१५.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराचा अपील अर्ज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सध्याचे कार्यकारी अभियंता, श्री. हि.अ.श्रीमाळ यांचेशी संबंधित असल्याने त्यांचेकडे पाठविण्यांत आला. तसेच अपील अर्जावर योग्य ती कार्यवाही वेळेत करुन अपिलकारास लेखी माहिती द्यावी असे सह प्रकल्प संचालकांनी कळविले.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती मिळाली नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यातआली. सुनावणी करिता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने निष्कासनाचा दाखला, रिपेअरिंग, बेनीफीट सर्टिफिकेटची मागणी केली होती. सदर माहिती देण्याची जबाबदारी पुनर्वसन व पुनर्वसाहत या विभागाची नसल्याने अपिलकाराचा आयडी क्र.३८, माहितीच्या अधिकारातील अर्ज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता, श्री. श्रीमाळ यांचेकडे पाठविण्यांत आला. अपिलकाराच्या घराचे अंशतः बाधित तोडलेल्या क्षेत्रफळाबाबतचे प्रमाणपत्र मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दि.४.१०.२००७ रोजी अपिलकारास देण्यात आले. रिपेअरिंग तसेच बेनिफीट प्रमाणपत्र मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत देण्यात येत नाही. तोडण्यात आलेल्या जागेच्या अधिक क्षेत्रफळाबाबत भूमी शाखा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे यांचेशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१८.१२.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०७३/०२**

**श्री. लेस्ली अल्मेडा,** **------ अपीलकर्ता**
**कासा अल्मेडा, फ्लॅट नं.१०३,**
**१, सेंट जोसेफ रोड, सेंट पॉल रोड,**
**वांद्रे (प.), मुंबई४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था (३),**
**पश्चिम उपनगरे, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, म्हाडा बिल्डिंग, तळमजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप निबंधक सहकारी संस्था, एच/पश्चिम वॉर्ड,**
**सहकार बाजार, ४ था मजला, वांद्रे रेल्वे स्टेशनसमोर,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. लेस्ली अल्मेडा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, एच/पश्चिम वॉर्ड, वांद्रे (प), मुंबई यांच्याकडे दि.६.८.२००७ रोजी अर्ज करुन, सॅलसेट कॅथॉलिक सहकारी गृहनिर्माण संस्थेतील कागदपत्राची मागणी केली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारारस दि.२९.८.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधंक सहकारी संस्था (३), गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व, मुंबई यांचेकडे दि. २४.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ११.१०.२००७ रोजी सुनावणी आयाजित करण्यात आली. जन माहिती अधिकाछ्यांनी अपिलकारास दि.

२९.८.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकाराचे प्रथम अपील फेटाळले व तसे दि.२२.१०.२००७ रोजी आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन, अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि. ६.८.२००७ च्या अर्जान्वये सॅलसेट कॅथलिक सहकारी गृहनिर्माण संस्थेतील कागदपत्राची, जसे संस्थेतील प्लॉट क्र.३०-ए मध्ये व्यापारी घडामोडी चालत असल्याबाबत संस्थेच्या सचिवांना श्री. सेलवन अलमेडा यांनी दि. १४.२.२००७ रोजी दिलेल्या पत्राची प्रत, मॅनेजिंग कमिटीच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत इ. चार मुद्दयांसबंधी माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था स्तरावरील असल्याने सदरची माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेणेबाबत जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर समर्पक असून, नियमानुसार असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०७२/०२**

**श्री. शेषराव शिवराम गायकवाड, ------ अपीलकर्ता**
**ब-२५९/५, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा भाषा संचालक,**
**भाषा संचालनालय, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भाषा संचालक,**
**भाषा संचालनालय, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. ------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. शेषराव शिवराम गायकवाड, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भाषा संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडे दि.१३.७.२००७ रोजी दोन अर्ज करुन, त्यांची राज्य निवडणूक आयोगातून भाषा संचालनालयात बदली करण्याबाबत केलेल्या विनंतीबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती, राज्य निवडणूक आयोगात प्रतिनियुक्ती भत्ता मिळणेबाबत, इ. माहिती तसेच श्री.अ.रा.जाधव, अनुवादक यांची सेवाविषयक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.६.८.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण, खोटी माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा भाषा संचालक यांचेकडे दि.५.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.६.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. तसेच अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-यांनी खालीलप्रमाणे दि.३.११.२००७ च्या पत्रान्वये कळविले.

" अपिलकाराने त्यांची नागपूर येथे बदली करण्याकरिता वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे. त्यानंतर पुढील कार्यवाही करता येणे शक्य होईल. अपिलकाराची राज्य निवडणूक आयोगातून मुख्यालयात बदली करण्याच्या विनंतीवर स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु झालेली आहे. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, श्री.शेषराव गायकवाड यांची भाषा संचालनालयात माजी सैनिकामधून नेमणूक झालेली आहे. त्यांची बदलीने राज्य निवडणूक आयोगात नियुक्ती करण्यांत आली. त्यांची राज्य निवडणूक आयोगातून भाषा संचालनालयात नागपूर येथे बदली करण्याची मागणी दिसते. नागपूर येथे बदली करण्याकरिता वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास कळविले. वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याची अप्रस्तुत व गैरवाजवी अट असल्याचा अपिलकाराचा दावा दिसतो. श्री.अ.रा.जाधव, अनुवादक यांची नागपूर येथे बदली केली. अपिलकाराची बदली केली नाही. त्यामुळे अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली. सदर प्रकरण सेवा विषयक बाबीशी संबंधित आहे. अपिलकार माजी सैनिक आहे. सदर बाब लक्षात घेता शासकीय कर्मचा-यांच्या बदली अधिनियमातील तरतुदीस अधिन राहून अपिलकाराची नागपूर येथे बदली करण्याची विनंती भाषा संचालकांनी विचारात घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी अशी आयोगाची शिफारस आहे.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७४२/०२**

**श्री. रवि नायर,** **------ अपीलकर्ता**
**एफ/४, सावला चाळ, चिमनपाडा,**
**मरोळ नाका, अंधेरी (पूर्व), मुंबई४०० ०५९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ईस्ट विभाग,**
**आझाद रोड, गुडावली रोड,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई४०० ०५९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (मेंटेनन्स),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ईस्ट विभाग,**
**आझाद रोड, गुडावली रोड,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई४०० ०५९.** **------- उत्तरवादी**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. रवि नायर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (मेंटेनन्स), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ईस्ट विभाग, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्याकडे दि. १३.२.२००७ रोजी अर्ज करुन, चिमटपाडा, मरोळ येथील मुख्य बाजारा शेजारील बालवाडीबाबत सविस्तर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांच्याकडे दि. २१.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना तोंडी सूचना दिल्या. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची फाईल उपलब्ध झाल्यानंतर अपिलकारास माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. १९.५.२००७ च्या पत्रान्वये उत्तर दिले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य

माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी व अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (मेंटेनन्स), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ईस्ट विभाग, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्याकडे दि. १३.२.२००७ रोजी अर्ज करुन, चिमटपाडा, मरोळ येथील मुख्य बाजारा शेजारील बालवाडीबाबत सविस्तर माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती फार वर्षापूर्वीची असल्याने संबंधित कागदपत्रांचा शोध घेऊनही कागदपत्र उपलब्ध झाले नाहीत. दरम्यान अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. संबंधित फाईलचा काळजीपर्वक शोध घेऊन फाईल उपलब्ध झाल्यास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी सांगितले होते. जन माहिती अधिका-यांनी संबंधित कागदपत्रांचा पुन्हा कसून शोध घेतला असता कागदपत्र प्राप्त झाल्यावर अपिलकारास मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचा सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन जन माहिती अधिका-यांनी युक्तिवाद केला. अपिलकारास दिलेली माहिती ही जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास सादर केली. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०१६/०२**

**श्री. सुभाष सुंदरदास बंगेरा,** **------ अपीलकर्ता**
**९५/१३, गारोडीया इस्टेट,**
**डॉ.वसंत अवसरे मार्ग, मिलन सबवे रोड,**
**सांताक्रूझ (प.), मुंबई४०० ०५४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट विभाग,**
**वांद्रे (प.), मुंबई४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट विभाग,**
**वांद्रे (प.), मुंबई४०० ०५०.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सुभाष सुंदरदास बंगेरा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट विभाग, वांद्रे (प.), मुंबई यांच्याकडे दि. १८.६.२००७ रोजी अर्ज करुन, सांताक्रझ (पूर्व) खोतवाडी बसंत रोड, साईनाथ मंदिरासमोरील मायाराम पांडे चाळ येथील अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट विभाग, वांद्रे (प.), मुंबई यांच्याकडे दि.२.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १४.८.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागितलेली माहिती १५ दिवसांच्या आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी असे दि.२७.८.२००७ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेव अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट विभाग, वांद्रे (प.), मुंबई यांच्याकडे दि. १८.६.२००७ रोजी अर्ज करुन, सांताक्रझ (पूर्व) खोतवाडी बसंत रोड, साईनाथ मंदिरासमोरील मायाराम पांडे चाळ येथील अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास माहिती द्यावी. अन्यथा त्यांचेविरुध्द उक्त अधियिमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०३४/०२**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज,** **------ अपीलकर्ता**
**घनश्यामदास चाळ, रुम क्र.२,**
**संत रोहिदास मार्ग, धारावी, मुंबई-४०० ०१७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**ग्राहक हितरक्षक (उत्तर),**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवन उपक्रम,**
**लोकमान्य टिळक मार्ग,दादर, मुंबई४०० ०१४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**ग्राहक सेवा, वीजग्राहक विभाग,**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवन उपक्रम,**
**लोकमान्य टिळक मार्ग,दादर, मुंबई४०० ०१४.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट विभाग, वांद्रे (प.), मुंबई यांच्याकडे दि.४.१०.२००७ रोजी अर्ज करुन, ओमदत्त सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. एस.१८१, खाबदेव धारावी, मुंबई येथील झोपडपट्टी सुधार योजना अंतर्गतच्या इमारतीतील बेस्ट विद्युंत पुरवठा उपक्रमाने बसविलेल्या मीटरबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी अधिकारी तथा उप मुख्य अभियंता यांच्याकडे दि. १३.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेण्याबाबत अपिलकारास दि. १३.१२.२००७ च्या पत्रान्वये कळविण्यांत आले. प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशानुसार अपिलकारास जन माहिती अधिका-याने दिलेली माहिती अपुरी असल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२१.१०.२००८

रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट विभाग, वांद्रे (प.), मुंबई यांच्याकडे दि.४.१०.२००७ रोजी अर्ज करुन, ओमदत्त सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. एस.१८१, खाबदेव धारावी, मुंबई येथील झोपडपट्टी सुधार योजना अंतर्गतच्या इमारतीतील बेस्ट विद्युंत पुरवठा उपक्रमाने बसविलेल्या मीटरबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश दिल्यानंतर अपिलकारास १७ सभासदांच्या विद्युत मीटर ऐवजी ११ सभासदांच्या विद्युत मीटरची माहिती दिली. पाच सभासदांच्या विद्युत मीटरची माहिती अपिलकारास दिली नसल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केल्याप्रमाणे उर्वरित पाच विद्युती मीटर बाबतची अनुषंगिक माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपिलकारास १५ दिवसाचे आत माहिती दयावी. अन्यथा त्यांचेविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०८९/०२**

**श्री. मोहन अनंत खोत,** **------ अपीलकर्ता**
**५९६/४७, एम.एम.जोशी मार्ग, मुंबई.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता (उत्तर) यांचे कार्यालय,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**दादर, मुंबई४०० ०१४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, ई विभाग,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**अभ्युदय नगर, इमारत क्र.३४,काळाचौकी, मुंबई.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मोहन अनंत खोत, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, काळाचौकी, मुंबई यांच्याकडे दि. ६.११.२००७ रोजी अर्ज करुन, ५९६, गंगाराम निवास, ना.म.जोशी मार्ग, भायखळा, मुंबई या इमारतीच्या सर्व मजल्यावरील संडास सांडपाणी गळती, अभियंता श्री.सखर यांच्या दि.२४.१०.२००७ रोजी निदर्शनास आणून दिली. याबाबत त्यांनी कार्यालयास सादर केलेल्या अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती.

एकत्रित पहाणी दरम्यान मे.सोळंकी ग्रूप (ठेकेदार) हे अनुपस्थित राहिल्याकारणाने त्यांना कार्यकारी अभियंता कार्यालयातर्फे दि.२४.१०.२००७ रोजी पत्र पाठवून इमारतीतील आवश्यक त्या दुरुस्तीकरिता निर्देश देण्यात आले असल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. २४.११.२००७ च्या पत्राने कळविले.

जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, दादर, मुंबई यांच्याकडे दि. २९.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १०.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. कथित दुरुस्तीबाबत श्री.सखर, उप अभियंता यांनी सडास सांडपाणी गळतीबाबत पहाणीचा स्वतंत्र अहवाल तयार केला नाही. त्यामुळे तसा अहवाल अपिलकारास सादर करण्यांत आला नाही असे जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. इमारतीच्या दुरुस्ती कामाबाबत जन माहिती अधिका-यांनी ठेकेदारास दि.१५.१०.२००७

रोजी पत्राने कळविले. पत्राची प्रत अपिलकारास देण्यात आली. सदर बाबी नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १३.१२.२००७ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकालात काढले.

जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले. सदर अपिलावर दि. २३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, काळाचौकी, मुंबई यांच्याकडे दि. ६.११.२००७ रोजी अर्ज करुन, ५९६/४७, गंगाराम निवास, ना.म.जोशी मार्ग, भायखळा, मुंबई या इमारतीच्या सर्व मजल्यावरील संडास सांडपाणी गळती, अभियंता श्री.सखर यांच्या दि.२४.१०.२००७ रोजी निदर्शनास आणून दिली. याबाबत त्यांनी कार्यालयास सादर केलेल्या अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती. उप अभियंता, श्री. सखर, यांनी सदरहू इमारतीच्या सर्व मजल्यावरील संडास सांडपाणी गळतीची बुधवार दि.२४.१०.२००७ रोजी अपिलकार व उपस्थित रहिवासी यांच्या समक्ष पहाणी केली होती. याबाबत उप अभियता यांनी उपरोक्त पहाणीचा स्वतंत्र अहवाल तयार केला नाही. त्यांच्याकडे असलेला जास्तीचा कार्यभार व इतर इमारतीचे नियमित पहाणीचे काम असल्यामुळे स्वतंत्र अहवाल बनविण्यात आला नाही. त्यामुळे तसा अहवाल अपिलकारास सादर करण्यात आला नसल्याची बाब प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी चर्चेस आली होती. या प्रकरणी महत्वाचा मुद्दा इमारतीच्या सर्व मजल्यावरील संडास सांडपाणी गळती दुरुस्तीचा दिसून येतो. इमारतीच्या दुरुस्ती कामाबाबत दि.२४.१०.२००७ रोजी पहाणी करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदारास दि.१५.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविले. सदर पत्राची प्रत अपिलकारास देण्यात आली. परंतु इमारतीची दुरुस्ती झाली किंवा कसे, याबाबत सदर कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, ५९६/४७, गंगाराम निवास या इमारतीच्या दुरुस्तीचे काम केव्हा करण्यात आले या विषयी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,/दिनांक :-२३/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०७७/०२**

**श्री. अफजल शेख,** **------ अपीलकर्ता**
**साईबाबा सोसायटी नं.३, रुम नं.३, डी/३,**
**म्हाडा कॉलनी, मालवणी, गेट नं.८,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०९५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदारवाडी,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदारवाडी,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. अफजल शेख, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नार्थ विभाग, मालाड, मुंबई यांच्याकडे दि. २१.३.२००७ व ७.४.२००७ रोजी अर्ज करुन, (१) मालवणी नं.१, बी.एम.सी.कॉलनीसमोर असलेल्या साधना बियर बारच्या तळमजला अधिक पहिल्या मजल्याच्या बांधकामाची माहिती, (२) इजीमा बिल्डिंग, गोरेगांव स्पोर्ट क्लबच्या मागे, रहेजा ले आऊट, लिंक रोड, मालाड (प.) ही इमारत कमर्शिअल असताना त्यातील काही गाळयामध्ये लोखंडी चॅनेल टाकून पोटमाळे काढण्यात आले आहेत. या दोन्ही मुद्यांबाबतची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी साधना बियर बार हे अधिकृत आहे की अनधिकृत याबाबतची माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याने माहिती देता येणे शक्य नाही असे अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांच्याकडे दि.१७.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी घेऊन अपिलकारास

सुधारित माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१८.७.२००७ रोजी आदेश पारित करुन अपील निकाली काढले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने (१)मालवणी नं.१, बी.एम.सी.कॉलनीसमोर असलेल्या साधना बियर बारच्या तळमजला अधिक पहिल्या मजल्याच्या बांधकामाची माहिती, (२) इजीमा बिल्डिंग, गोरेगांव स्पोर्ट क्लबच्या मागे, रहेजा ले आऊट, लिंक रोड, मालाड (प.) ही इमारत कमर्शिअल असताना त्यातील काही गाळयामध्ये लोखंडी चॅनेल टाकून पोटमाळे काढण्यात आले आहेत. या दोन्ही मुद्यांबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नाही. अपिलकारास माहिती देणे बाबत जन माहिती अधिका-यांना प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१८.७.२००७ रोजी आदेश दिले होते. तरीही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन दयावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनिमयातील कलम -२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०७९/०२**

**श्री. गौतम विजय बोरा,** **------ अपीलकर्ता**
**२५३८, एम.जी.रोड,**
**अहमदनगर.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**संचालक (माहिती), वृत्त व जनसंपर्क,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. गौतम विजय बोरा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दि.१०.९.२००८ रोजी अर्ज करुन, श्री. शिवाजी सुखदेव मानकर, उपसंचालक (माहिती), नाशिक यांच्याबाबत एकूण ७ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि. १०.१०.२००७ रोजीच्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १३.११.२००७ रोजी प्रथम अपिलावर आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणी केलेली माहिती विहित मुदतीत दिली आहे. अपिलकारास देण्यात आलेली माहिती प्रथम अपिलीय अधिका-यांनी मुद्देनिहाय तपासली असता ती बरोबर असल्याचे निदर्शनास आले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिलेले उत्तर उक्त अधिनियमातील तरतुदी नुसार असल्याचे स्पष्ट होते असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपील फेटाळले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित

करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दि.१०.९.२००८ रोजी अर्ज करुन, श्री. शिवाजी सुखदेव मानकर, उपसंचालक (माहिती), नाशिक यांच्याबाबत एकूण ७ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराच्या अर्जातील मुद्दा क्र.१, २, ३, ४, ५ व ७ बाबत अपिलकारास माहिती दिली. मुद्दा क्र. ६ बाबत उक्त अधिनियमातील कलम ८ (ड) (त्र) अनुसार माहिती नाकारली. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असलयाने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७६१/०२**

**श्री. रसिकलाल शहा, ------ अपीलकर्ता**
**ईलिसिम, २९३/२९५, झवेरी बिल्डिंग,**
**नाना चौक, ताडेदव, मुंबई-४०० ००७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता.**
**झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),मुंबई- ४०० ०५१.. ------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. रसिकलाल शहा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.२७.४.२००७ रोजी अर्ज करुन, शांतीनगर, कोलेकल्याण, अंधेरी येथील सीटी सर्वे क्र. ४०९३, ४०९३/१ ते ४ येथील प्लॉटवरील प्रस्तावित झोपडपट्टी सुधार योजनेबाबतची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणी केल्याप्रमाणे झोपडपट्टी सुधार योजने बाबतची माहिती विहित कालावधीत दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी यांचेकडे दि. २९.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २२.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती / प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि.२७.४.२००७ रोजी अर्ज करुन, शांतीनगर, कोलेकल्याण, अंधेरी येथील सीटी सर्वे क्र. ४०९३, ४०९३/१ ते ४ येथील प्लॉटवरील प्रस्तावित झोपडपट्टी सुधार योजनेबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणी केलेली माहिती दि. १८.९.२००८ च्या पत्रासोबत उपलब्ध करुन दिली. सदर माहितीची प्रत जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी आयोगास सादर केली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११३९/०२**

**श्री. प्रकाश प्रभुलालजी दहिया,** **------ अपीलकर्ता**
**१५/१३१, पारसेकर चाळ,**
**कोलडोंगरी, अंधेरी, मुंबई.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

श्री. प्रकाश प्रभूलालजी दहिया, मुंबई यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि. ३१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता अपिलकार व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिका-यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी खुलाशानुसार अपिलकाराने श्री. तिरुपती बालाजी को.ऑप.हौसिंग सोसायटी, अंधेरी या संस्थेच्या सदनिका वाटपाच्या माहितीची तसेच संस्थेच्या नोंदणी धारिकेतील कागदपत्रांची माहिती जन माहिती अधिका-यांकडे मागितली होती. सदनिका वाटपाची माहिती संस्था पातळीवर असल्याने ती त्यांच्याकडून घेण्याबाबत जन माहिती अधिका-याने अपिलकाराला कळविले. तसेच संस्थेच्या नोंदणी धारिकेतील मागणी केलेली कागदपत्रे जन माहिती अधिका-यांनी अपिलकार कार्यालयात आले असता प्रत्यक्षात उपलब्ध करुन दिली.

अपिलकाराने कागदपत्र न मिळाल्यामुळे द्वितीय अपील दाखल केले. तथापि, जन माहिती अधिका-यांनी त्यांचेशी संबंधित असलेली सर्व माहिती अपिलकारास दिलेली आहे. त्यांच्याकडे उपलब्ध नसलेली माहिती कोणाकडून मिळेल याबाबतही अपिलकास कळविले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११४६/०२**

**श्री.मोईन अखतर कुरेशी, ------ अपीलकर्ता**
**बैतुल अखतर बिल्डिंग, १ ला मजला,**
**रुम नं.१८/१९, दिल्ली दरबार हॉटेलच्यावर,**
**पट्ठे बापूराव मार्ग, मुंबई- ४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, डी वॉर्ड,**
**नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई- ४०० ००७**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, डी वॉर्ड,**
**नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई- ४०० ००७. ------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

श्री. मोईन अखतर कुरेशी, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि. ३१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी व अपिलकार हजर होते.

अपिलकाराने कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहरे, यांनी ईबी/२१४०/आरआर, दि.११.३.१९९७ अन्वये बैतुल अख्तर बिल्डिंग, पट्ठे बापूराव मार्ग, मुंबई-४०० ००४ या इमारतीची चेकलिस्ट तसेच इमारतीच्या नकाशाची / कागदपत्राची दोन प्रतीत अशी माहिती जन माहिती अधिका-

यांकडे मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी सदर माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसून ती कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहरे, १, ई विभाग, महापालिका कार्यालय, भायखळा, मुंबई-८ यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकेल असे अपिलकाराला कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती चुकीची आाहे या कारणास्तव, अपिलकाराने प्रथम अपील दाखल केले. तथापि, प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिका-याच्या कार्यालयामध्ये दि. १.८.१९९८ पासून अभिलेख जतन केले जातात व अपिलकाराने मागितलेली माहिती ही सन १९९७ सालची असल्यामुळे ती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. हे जन माहिती अधिका-यांचे म्हणणे प्रथम अपिलीय अधिका-यांनी मान्य केले व अपील निकाली काढले. जन माहिती अधिका-यांनी चुकीची माहिती दिली व प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपीलकाराचे म्हणणे न ऐकता आदेश पारित केले. या कारणास्तव अपिलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिका-यांकडे सन १९९८ पासून अभिलेख जतन केले जातात. त्यामुळे त्यांच्याकडे अपिलकाराने मागितलेली सन १९९७ ची माहिती उपलब्ध नाही. ती त्यांना कोणाकडून उपलब्ध होऊ शकेल या विषयीही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले आहे. यामध्ये जन माहिती अधिका-यांनी चुकीची माहिती दिली असे समजण्याचे कोणतेही कारण नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११०७/०२**

**श्री. नरेंद्र गजानन गांधी, ------ अपीलकर्ता**
**पारसनगर बिल्डिंग लं.१, अपार्टमेंट नं.२/बी/१०२,**
**शंकरलेन, कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अधिक्षक भूमी अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा,**
**प्रशासकीय इमारत, १० वा मजला,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, डी वॉर्ड,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,**
**गोरेगांव, मुंबई बेस्ट कॉलनी,**
**दादासाहेब रुपवते मार्ग, मुंबई- ४०० १०४. ------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

श्री. नरेंद्र गजानन गांधी, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि. २४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता उत्तरवादी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते.

अपिलकाराने गाव वळणई, ता.बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हा येथील न.भू.क्र.१७, १८, १९, २३ पै या मिळकतीबाबतची माहिती मागितली होती. अपिलकाराला नेमकी कोणत्या प्रकारची माहिती आवश्यक आहे याचा जन माहिती अधिका-यांना बोध न झाल्याने त्यांनी अपिलकाराने एक खिडकी अधिकारी यांचेशी संपर्क साधून त्यांना आवश्यक ती माहिती घ्यावी, असे कळविले. तसेच कमी जास्त पत्रकाचा उताराबाबत नक्कल फी

भरुन ते प्राप्त करुन घेण्याबाबत, चौकशी नोंदवही उताराबाबत अधिक्षक, भूमी अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व) यांचेकडे अर्ज सादर करुन त्यांचे आदेश प्राप्त झाल्यावर त्याची प्रत पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराला कळविले. अपिलकाराने दाखल केलेल्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी अर्जदाराच्या अर्जानुसार माहिती पुरविण्यात यावी, नक्कल फी त्यांना कळविण्यांत यावी तसेच मुंबई अपार्टमेंट ॲक्टप्रमाणे मिळकत पत्रिकेस नोंदी घेतल्या जात नाहीत अथवा त्याप्रमाणे कोणीही अर्ज दाखल केलेले नाहीत अशीही माहिती देण्याबाबत कळविले. त्याप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी कार्यवाही केली. जन माहिती अधिका-याकडे अपिलकाराने मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती अभिलेख स्वरुपात होती ती अपिलकारास उपलब्ध करुन दिलेली आहे. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११५०/०२**

**श्री. संतोष जिवाजी दळवी,** **------ अपीलकर्ता**
**२/२८, बी.डी.डी. चाळ, पहिला मजला,**
**ना.म.जोशी मार्ग, डिलाईल रोड, मुंबई-४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**गृहनिर्माण विभाग, २ रा मजला,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**गृहनिर्माण विभाग, २ रा मजला,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

श्री. संतोष जिवाजी दळवी, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि. ३१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

अपिलकाराने पोलीस कर्मचा-यासाठी अल्प गट उत्पन्नांतर्गत प्रतिक्षा नगर, चुनाभट्टीजवळ, मुंबई येथे म्हाडाच्या सदनिका उपलब्ध करणेबाबत या विषयाच्या अनुषंगाने नस्ती क्र.वाटप/११०६/प्र.क्र.५०९/गृ.नि.भू.१ या नस्तीची छायांकित प्रत व या योजनेच्या अनुषंगाने काही मुद्दयांची माहिती जन माहिती अधिका-यांकडे मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अंतिम निर्णय झालेला नसल्यामुळे सद्यःस्थितीत माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले. यासंदर्भात

अपिलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-याने दिलेली माहिती योग्य असल्याचे नमूद केले. तथापि, अपिलकारास मागणी केलेल्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात असे आदेश पारित केले. जन माहिती अधिका-याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीच्या नस्तीवर अंतिम निर्णय झालेला नसल्याने अपिलकारास जन माहिती अधिकारी माहिती देऊ शकले नाहीत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीच्या नस्तीवर निर्णय झाल्यानंतर अपिलकारास जन माहिती अधिका-याने तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिाानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१११८/०२**

**श्री. चंगेडे शशिकांत प्रेमराज, ------ अपीलकर्ता**
**३४६३, ख्रिस्त गल्ली, अहमदनगर-४१४ ००१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. ------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

श्री. चेंगडे शशिकांत प्रेमराज, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि. २७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता उत्तरवादी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

अपिलकाराने दि.२०.७.२००७ रोजी मंत्री महोदयाकडे सुनावणीकामी ठेवण्यात आलेल्या अपिलकाराची व प्रतिवादीच्या नावाची यादी, मागील ७ वर्षापासून नागरी बँका, पतसंस्थांना सहकार कलम १५२ व १५४ नुसार दाखल अपिलावर देण्यात आलेले स्थगिती आदेश, अशा स्थगिती आदेशावर सुनावणी बाकी असलेली प्रकरणे, श्री.गुंदेचा यांचेकडील १५२ नुसार दाखल झालेल्या अपिलावरील कार्यवाहीबाबतची माहिती, दफ्तर दिरंगाईमुळे करण्यात आलेली कार्यवाही अशा स्वरुपाची माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-या कडे अर्ज केला होता. अपिलकाराने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व्यापक असल्यामुळे माहिती देण्यास जन माहिती अधिका-याकडून विलंब झाला. अपिलकाराने दाखल केलेल्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती अर्जाप्रमाणे

माहिती द्यावी असे आदेश दिले. तथापि, जन माहिती अधिका-याकडून अपिलकाराला अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी/जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने सहकार मंत्री यांचेकडे सुनावणीसाठी ठेवण्यात आलेल्या मागील सात वर्षापासूनच्या किती नागरी बँका व पतसंस्थांना सहकार कलम १५२ व १५४ नुसार दाखल अपिलावर स्थगिती आदेश देण्यात आले, किती स्थगिती आदेशावर सुनावणी होणे बाकी आहे, सहकार मंत्री यांनी दिलेल्या पत्रावर खात्याकडून झालेल्या कार्यवाहीची मागणी इ. ची माहिती मागितली होती. माहितीचे व्यापक स्वरुप लक्षात घेता, जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११४२/०२**

**श्री. दिलीप नागू भुवड, ------ अपीलकर्ता**
**लाभकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**इमारत क्र.२, फ्लॅट नं.०४, तळमजला,**
**संतोषीमाता रोड ऑफ लक्ष्मण म्हात्रे रोड,**
**नवागांव, दहिसर (प.), मुंबई-४०० ०६८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/उत्तर विभाग,**
**जयवंत सावंत मार्ग, दहिसर (प.), मुंबई- ४०० ०६८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/उत्तर विभाग,**
**जयवंत सावंत मार्ग, दहिसर (प.), मुंबई- ४०० ०६८. ------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

श्री. दिलीप नागू भुवड, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि.३१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता उत्तरवादी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

अपिलकाराने सचिव, लाभकृपा को.ऑप.हौ.सो.लि.दहिसर (प.) यांनी अपिलकाराच्या सदनिके संबंधात महानगरपालिकेला पाठविलेल्या दि.२.४.२००७ च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची तसेच काही शासन परिपत्रक सदर प्रकरणी लागू होतात किंवा कसे याबाबतची माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-याकडे अर्ज केला होता. सदर माहितीसाठी आवश्यक असलेल्या शुल्काची माहिती जन माहिती अधिका-याने अपिलकारास कळविली.

अपिलकाराने शुल्क भरले. मात्र शुल्क भरल्याची माहिती संबंधितांना दिली नाही. त्यामुळे त्यांना माहिती मिळाली नाही. तथापि शुल्क भरुनही माहिती मिळाली नाही या कारणास्तव त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकाराला त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिका-यांने सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्याकडे पाठपुरावा करुन एका महिन्यात उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले.

तथापि, अपिलकाराला अद्याप माहिती मिळाली नाही. सबब, हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११३७ /०२**

**श्री. इकबाल जी. पटेल,** **------ अपीलकर्ता**
**फरदीन मॅन्शन, १५/१५ अे,**
**वी.एस.मार्ग, माहीम, मुंबई-४०० ०२६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ वॉर्ड,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**वरिष्ठ निरीक्षक (लायसन),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ वॉर्ड,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,दादर, मुंबई- ४०० ०२८.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

श्री. इकबाल जी.पटेल, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि. ३१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता उत्तरवादी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

अपिलकाराने कॅडल क्वीन को.ऑप.हौ.सोसायटीच्या इमारतीवर श्री.सोहेल खान यांना होर्डिंग्ज लावण्यासाठी दिलेल्या परवानगीच्या अनुषंगाने माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-याकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराला माहिती पुरविलेली आहे. फक्त अपिलकाराने केलेल्या तक्रारीवर कार्यालयात असलेल्या अभिलेखाच्या आधारे केलेल्या कार्यवाहीची माहिती देणे बाकी आहे. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी याबाबतची माहिती अपिलकाराला पुरवावी असे जन माहिती अधिका-यांना आदेश दिले.

अपिलकाराने विचारलेल्या माहितीच्या अनुषंगाने जन माहिती अधिका-याने अपिलकाराच्या तक्रारीवरील कार्यवाहीच्या माहितीखेरील इतर माहिती पुरविलेली आहे. अपिलकाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती वा जी वस्तुस्थिती असेल ती अपिलकाराला हे आदेश प्राप्त झाल्या पासून १५ दिवसाचे आत कळवावी असे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०९४/०२**

**श्री. संजू बाबू बावदाणे,** **------ अपीलकर्ता**
**कॅम्प क्र.७, खोली क्र.९६,**
**आकृती निर्माण लि.साईवाडी तेली गल्ली,**
**अंधेरी (पूवै.), मुंबई४०० ०६९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक सचिव,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, विद्यानगरी कॅम्पस,**
**कालिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**मुंबई विद्यापिठ, मुंबई - ४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

श्री. संजू बाबू बावदाणे, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि.२४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. उत्तरवादी हजर नव्हते.

अपिलकाराने मुंबई विद्यापीठ संलग्नित द्वारकादास जे. संघवी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माहिती अधिकारी यांचे नांव पत्ता यांचे संदर्भात माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सदर महाविद्यालय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

च्या सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत बसत नसल्यामुळे माहिती नाकारली. मात्र, मुंबई विद्यापिठाच्या जन माहिती अधिका-यांनी सदर महाविद्यालयाच्या प्राचार्यांना माहिती देण्याविषयी दोन वेळा कळविले. तरीही माहिती अपिलकाराला पुरविण्यात आली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-याच्या आदेशानुसार अधिनियमातील तरतुदीनुसार देता येण्यासारखी माहिती अपिलकाराला देण्यात आली आहे. तथापि, प्रथम अपिलीय प्राधिका-यांच्या आदेशावरुन वर नमूद महाविद्यालयामध्ये जन माहिती अधिकारी नेमले किंवा कसे याबाबत स्पष्टता होत नाही.

सबब, हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराला मागितलेली माहिती १५ दिवसाचे आत पुरवावी. सदर महाविद्यालय माहिती अधिकार अधिनियमाच्या कक्षेत येत नसल्यास त्याबाबतच्या कारणमिमांसेसह अपिलकाराला कळवावे व त्याची एक प्रत आयोगाला सादर करावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११४३/०२**

**श्री. राजू दुदम,** **------ अपीलकर्ता**
**अ/अे/६१०, कुमकुम को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्रतिक्षा नगर, सायन (पूवै.), मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा,**
**इस्टेट मॅनेजर, बी/एमबी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**इस्टेट मॅनेजर, बी/एमबी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१..** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

श्री. राजू दूदम, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि.३१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

अपिलकाराने सायन प्रतिक्षा नगर येथे अल्प उत्पन्न गटातील सदनिका वितरणाच्या योजनेबाबत काही माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिका-यांनी मागितलेल्या ६ मुद्यांच्या माहितीपैकी दोन मुद्दयांची माहिती दिली व इतर माहिती मिळकत व्यवस्थापक/ मु.इ.दु.व पु. मंडळ

(संक्रमण शिबीर) या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांच्याकडून उपलब्ध करुन घेण्याचे अपिलकारास कळविले. तथापि, अपिलकाराचा माहितीचा अर्ज त्या प्राधिकरणाकडे पाठविल्याचे दिसून येत नाही.

अपिलकाराने प्रथम अपील दाखल केले. तथापि, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिका-यांनी उर्वरित माहितीसाठी अपिलकाराचा माहितीचा अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे पाठविलेला नाही. सबब, जन माहिती अधिका-यांनी संबंधित प्राधिकरणाकडून माहिती घेऊन ती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई ,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११५७/०२**

**श्री. किशोर मेहता,** **------ अपीलकर्ता**
**बी/ २०२, स्वस्तीक पार्क,**
**३२७/३२८, जवाहर नगर, रोड नं.१२,**
**गोरेगांव (पश्चिम), मुंबई- ४०० ०६२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ साऊथ वॉर्ड,**
**गोरेगांव, (प.), मुंबई - ४०० ०६२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ साऊथ वॉर्ड,**
**गोरेगांव, (प.), मुंबई - ४०० ०६२.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

श्री. किशोर मेहता, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि. ३१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

बृहन्मुंबई महानगरपालिका पी/साऊथ वॉर्ड यांनी दि.२.६.२००७ रोजी कलम ३५१ अन्वये निर्गमित केलेल्या नोटीसच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले का, याबाबत तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अशा स्वरुपाची माहिती मिळण्यासाठी अपिलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिका-यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) पी/ साऊथ वॉर्ड

यांना यासंदर्भात कायदेशिर प्रक्रियेची पूर्तता करुन अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही करण्याची व त्याबाबत अपिलकाराला माहिती देण्यात यावी असे आदेश दिले.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांच्या आदेशानंतरही अपिलकाराला माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराला अद्याप माहिती मिळाली नाही. सबब, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकाराला वर नमूद केल्याप्रमाणे अनधिकृत बांधकामाबाबत कायदेशीर प्रक्रियेची पूर्तता करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती पुरवावी व माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत शास्ती कां लावण्यात येऊ नये या बाबतचा खुलासा जन माहिती अधिका-यांनी तात्काळ आयोगाला सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई ,**
**दिनांक :-३१/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०९०/०२**

**श्री. सोमाजी मारुती कचरे,** **------ अपीलकर्ता**
**प्रवर्तन आणि परिरक्षण (उत्तर),**
**मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम,**
**पहिला मजला, पीर रोड इमारत,**
**वडाळा, मुंबई- ४०० ०३१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कर्मचारीय अधिकारी,**
**मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम,**
**बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कर्मचारीय अधिकारी (मावक),**
**मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम,**
**बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

श्री. सोमाजी मारुती कचरे, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि. २४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

अपिलकाराने सन २००७ मध्ये बेस्ट उपक्रमात "कार्यालय सहाय्यक" या पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेच्या निकालासंबंधी व इतर संबंधित माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपिलकाराला माहिती पुरविली. तथापि,

पुरविलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे या कारणास्तव अपिलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी द्वितीय अपिलामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने आयोगाकडे लेखी खुलासा सादर केला आहे. सदर खुलासा लक्षात घेता जन माहिती अधिका-यांनी चुकीची वा दिशाभूल करणारी माहिती दिली असे दिसून येत नाही. तसेच अपिलकाराला यापूर्वी पुरविण्यात आलेली माहिती लक्षात घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून अधिनियमांतर्गत अपेक्षित असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई ,**
**दिनांक :-२७/१०/२००८.**

**राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ ,मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक -२००८/७६३/०२**

**श्री.खंडू बंडू कांबळे,**
**देवनार अग्निशमन केंद्र, देवनार म्युनिसिपल कॉलनी]**
**एच-१ रुम नं.२,३ गोवंडी (प.) मुंबई- ४०० ०४३ ------- अपीलकार**

**विरूद्‌ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपायुक्त(फेनि/ निवडणूक )**
**महापालिका मुख्यालय,६ वा मजला,विस्तारित इमारत,**
**महापालिका मार्ग , फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जनमाहिती अधिकारी तथा प्रमुख अग्निशमन अधिकारी,**
**मुंबई अग्निशमन दल, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**ई विभाग, २ रा माळा, भायखळा, मुंबई-४०० ००८. ------- उत्तरवादी**

## - <u>विवेचन-</u>

श्री.बंडू खंडू कांबळे, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक १६/१०/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलकाराने अग्निशमन दलामध्ये सहाय्यक केंद्र अधिकारी यांच्या भरतीबाबत व त्यांच्या सेवाज्येष्ठतेबाबत एकूण चार मुद्दयावर माहिती मागितली होती.जनमाहिती अधिका-यांनी त्यांच्या दिनांक १५/५/२००७ च्या पत्रान्वये अपीलकाराला माहिती दिली.जनमाहिती अधिका-यांनी सहाय्यक केंद्र अधिकारी पदाच्या भरतीसाठी असलेल्या निकषाची प्रत व सहाय्यक केंद्र अधिकारी यांच्या भरतीची सेवाज्येष्ठता यादी सोबत जोडली असल्याचे त्यांच्या पत्रामध्ये म्हटले होते मात्र त्यांनी प्रत्यक्षात या प्रती सोबत जोडल्या नव्हत्या.त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी

पत्रासोबत न जोडलेली जोडपत्रे अपीलकाराला ७ दिवसाच्या आंत अपीलकाराला उपलब्ध करून देण्याचे नमूद करून आदेश पारित केले.

प्रथम अपीलीय प्राधिका-यांच्या आदेशानंतरही जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला माहिती न दिल्यामुळे त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सन १९७२ पासून मुंबई अग्निशमन दलामध्ये वेळोवेळी अधिका-यांची निवड पध्दतीने भरती करण्यात आली. सहाय्यक केंद्र अधिकारी या पदाच्या भरतीसाठी असलेले निकष व सहाय्यक अधिकारी यांच्या भरतीची सेवा ज्येष्ठता यादी याबाबतची प्रत अपिलकारास देण्यात आली. बृहन्मुंबई महानगरपालिके मध्ये सेवाज्येष्ठता ठरविण्यासाठी असलेले नियम संबंधित खात्याकडून मागवावेत. अग्निशमन दलात सेवाज्येष्ठता गुणवत्तेनुसार ठरविण्यात येते असे जन माहिती अधिका-यांनी दि.१५.५.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. यावरुन अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३०.५.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>निर्णय</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक -१६/१०/२००८.**

**राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ ,मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक -२००८/११४७ /०२**

**श्री. गजानन लक्ष्मण वाईरकर,**
**अंबा चाळ वाडी, जहाँगीर मेरवानजी पथ,**
**परळ, मुंबई - ४०० ०१२** **------- अपीलकार**

**विरूद्‌ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक महापालिका आयुक्त,**
**मालमत्ता विभाग, महानगनपालिका कार्यालय,**
**पलटण रोड, मुंबई- ४०० ००१**

**जनमाहिती अधिकारी तथा महानगरपालिका कार्यालय,**
**मालमत्ता विभाग, पलटण रोड, मुंबई- ४०० ००१** **------उत्तरवादी**

## - विवेचन-

श्री. गजानन लक्ष्मण वाईरकर, मुंबई यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलाची दिनांक ३१/१०/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व उत्तरवादींचे प्रतिनिधी उपस्थित होते.

परळ, मुंबई येथील अंबा चाळीस मजूर करण्यात आलेल्या जागेची मोजणी व सीमारेषा निश्चित करण्यात आली व यासंदर्भात संबंधित अधिका-यांच्या सुचनेप्रमाणे दिनांक २०/९/२००६ रोजी एकूण ८४ पानांचा अर्ज कार्यवाहीकरिता सादर करण्यात आला होता. या अर्जावरील कार्यवाहीबाबतची व अपीलकारांने दिनांक१३/११/२००७ रोजी सादर केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची अपिलकाराने जनमाहिती अधिका-यांकडे माहिती मागितली होती. जनमाहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही म्हणून अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी जनमाहिती अधिका-यांनी ७ दिवसाच्या आंत अपीलकाराला माहिती उपलब्ध करून दयावी

असे आदेश पारित केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांच्या आदेशानंतरही जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला माहिती पुरवली नाही.त्यामुळे अपीलकारांनी व्दितीय अपील दाखल केले.

जनमाहिती अधिका-यांनी अदयापही अपीलकाराला माहिती पुरवली नाही. सबब जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आंत माहिती विनाशुल्क पुरवावी , असे आदेश देण्यात येत आहे. तसेच जनमाहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करून दिली नसल्यामुळे याबाबत त्यांच्यावर अधिनियमातील तरतूदीनुसार शास्ती का लादण्यात येउ नये याबाबत आयोगाला २० दिवसाच्या आंत लेखी खुलासा व्यक्तिशः येउन सादर करावा. तसेच, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनीही विहित मुदतीत सुनावणी का घेतली नाहीचा याचा लेखी खुलासा सादर करावा.

**निर्णय**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक -३१ /१०/२००८.**

**राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ ,मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक -२००८/११४८/०२**

**श्री. भरत वि.गुर्जर,**
**७,गझदर स्ट्रीट, शिरजी भवन,**
**जे.एस. एस. रोड, मुंबई- ४०० ००२** **------- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक पालिका आयुक्त,**
**डी वॉर्ड,महापालिका कार्यालय, जोबनपुत्रा कंपाउंड,**
**नाना चौक, मुंबई- ४०० ००७.**

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) ,**
**डी वॉर्ड,महापालिका कार्यालय, जोबनपुत्रा कंपाउंड,**
**नाना चौक, मुंबई- ४०० ००७.** **------ उत्तरवादी**

## - विवेचन-

श्री. भरत वि.गुर्जर, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक ३१/१०/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला जनमाहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

अपीलकाराने महापालिकेकडे दिनांक १२/१०/२००७ रोजी तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने MMC Act अंतर्गत कार्यवाही सुरू असल्याचे अपीलकाराला कळवले. अर्जदाराने याअनुषंगाने दुकानदारांना बजावण्यात आलेल्या नोटीशींच्या प्रती देण्याची जनमाहिती अधिका-यांकडे मागणी केली होती. जनमाहिती अधिका-यांनी सदर बाबींशी संबंधित फाईलची पहाणी करण्यासाठी व अपीलकाराला आवश्यक असलेली त्यातील माहिती नोंद करून घेण्यासाठी बोलावले. तसेच यासंदर्भातील न्यायालयीन बाबीशी संबंधित माहितीसाठी उपविधीअधिकारी,

(शहर दिवाणी न्यायालय विभाग) महापालिका मुख्यालय , मुंबई यांच्याशी संपर्क साधण्यास सांगितले व माहिती अर्ज उपविधी अधिकारी यांच्याकडे अग्रेषित केला.

अपीलकारांनी जनमाहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी अपीलकार माहितीच्या पहाणीसाठी तयार नसल्याने MMC Act च्या कलम ३५१ अन्वये महापालिकेने दिलेल्या नोटीशीच्या छायांकित प्रती १५ दिवसाच्या आंत जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला उपलब्ध करून दयाव्यात असे आदेश दिले.आदेशानुसार जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला  नोटीशीच्या छायांकित प्रती व विधी विभागाच्या टिप्पणीच्या प्रती उपलब्ध करून दिल्या आहेत.

जनमाहिती अधिका-यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकाराला पुरवली आहे. तसेच जी माहिती विधी विभागाकडे आहे, त्यासाठी अपीलकाराचा अर्ज उपविधी अधिका-यांकडे पाठविला आहे व तसे अपीलकाराला कळविलेही आहे. वरील बाबी लक्षात घेता अधिनियमांतर्गत जनमाहिती अधिका-यांकडून व प्रथमअपीलीय प्राधिका-यांकडून अपेक्षित असलेली कार्यवाही पूर्णझाली आहे.  सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक-३१ /१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११०१/०२**

**श्री. विनायक रामचंद्र भेकरे,** **------ अपीलकर्ता**
**एल.आय.सी.ऑफ इंडिया,**
**शाखा क्र.९२२, आरिएंटल बिल्डिंग,**
**पहिला माळा, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक यांचे कार्यालय,**
**सहकारी संस्था, म.शा. मुं. (पर सेवा),**
**दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि.**
**भारतीय क्रिडा बिल्डिंग, ४ था माळा,**
**वडाळा, मुंबई- ४०० ०२१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विनायक रामचंद्र भेकरे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, वडाळा, मुंबई यांच्याकडे दि. २४.८.२००७ रोजी अर्ज करुन, सहायक निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन, मुंबई (परसेवा) दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असो.लि. वडाळा, यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये दिलेल्या क्र. केएनएसबी/१५९०/एसआरओ/रिको/ २००७, आदेशा संदर्भात माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, मुंबई यांच्याकडे दि. १२.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

" प्रतिवादी, सहायक निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन, मुंबई (पर सेवा), दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असो.लि. वडाळा, मुंबई यांनी अपिलकार श्री.भेकरे यांनी मागणी केलेली माहिती एक महिन्याच्या आत देण्यांत यावी असे आदेश पारित केले. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी मागितलेली माहिती देण्याबाबत आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, वडाळा, मुंबई यांच्याकडे दि. २४.८.२००७ रोजी अर्ज करुन, सहायक निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन, मुंबई (परसेवा) दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असो.लि. वडाळा, यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये दिलेल्या क्र. केएनएसबी/१५९०/एसआरओ/रिको/२००७, आदेशा संदर्भात माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. अपिलकारास एक महिन्याच्या आत मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दयावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १२.११.२००७ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-३१ /१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिाानियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११०४/०२**

**श्री. रविंद्र नाईक,** **------ अपीलकर्ता**
**पुष्कर मार्केटींग, १/१, उपेंद्रनगर,**
**सेनापती बापट मार्ग, दादर,मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई,**
**इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, ३ रा मजला,**
**बॅलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ०३८.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य बंदर अधिकारी,**
**महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई,**
**इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, ३ रा मजला,**
**बॅलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ०३८.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. रविंद्र नाईक, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई यांच्याकडे दि.२८.८.२००७ रोजी अर्ज करुन, मौ. आलेवाडी, नवापूर समुद्र किनारी समुद्रामध्ये तारापूर औद्योगिक वसाहतीमधील काही कारखानदार व व्यवसायिकांनी जेट्टी बांधण्यासाठी परवानगी मागितल्याबाबतची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागितलेली माहिती दि.८.११.२००७ व दि.२.१.२००८ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आली.. तसेच अपिलकाराने दि.१३.५.२००८ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती दि.९.७.२००८ व दि.८.९.२००८ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु सदर माहितीने समाधान न झाल्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दि.२२.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथित

होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई यांच्याकडे दि.२८.८.२००७ रोजी अर्ज करुन, मौ. आलेवाडी, नवापूर समुद्र किनारी समुद्रामध्ये तारापूर औद्योगिक वसाहतीमधील काही कारखानदार व व्यवसायिकांनी जेट्टी बांधण्यासाठी परवानगी मागितल्याबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.८.११.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहिती अपूर्ण असल्याचे अपिलकाराचे म्हणणे आहे. त्यामुळे संबंधित नस्तीची पहाणी करण्यासाठी दि. ११.९.२००८ ते १८.९.२००८ या कालावधीत अपिलकारास कार्यालयात बोलाविण्यात आले होते. परंतु अपिलकार उपस्थित राहिले नाहीत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी, अपिलकारास संबंधित नस्ती तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्राची तपासणी करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती १० दिवसाचे आत द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-३१ /१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/११२४/०२**

**श्री. रामचंद्र राजाराम मिश्रा,** **------ अपीलकर्ता**
**आनंद नगर, न्यू लिंक रोड,**
**जोगेश्वरी (प.), मुंबई- ४०० १०२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/वेस्ट वॉर्ड,**
**२ रा मजला, पालीराम पथ,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/वेस्ट वॉर्ड,**
**२ रा मजला, पालीराम पथ,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. रामचंद्र राजाराम मिश्रा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा, बृहन्मुंबई महानागरपालिका के/पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, झोपडी गणना मोहीम-२०००, आनंद नगर, न्यु लिंक रोड, जोगेश्वरी (प.), मुंबई येथील झोपडीधारकांना फोटोपास देणेबाबत व सुट्टीच्या दिवशी व कार्यालयीन वेळेनंतर गणना फॉर्म भरले जात असल्याबाबत तक्रारीसंबंधी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधी रु.५०/- इतके शुल्क भरल्यानंतर माहितीची सी.डी. उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.११.२००७ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका के/पश्चिम विभाग, यांच्याकडे प्रथम अपील दाखल

केले.  आनंदनगर ओशिवरा येथील झोपडयांची पहाणी सन १९९५ मध्ये केली नव्हती. सन १९८८ मध्ये आनंदनगर ओशिवरा येथील अस्तित्वात असलेल्या झोपडयांची पहाणी करुन एकूण ६८६ झोपडीधारकांची यादी तयार करण्यात आली होती. सदर कागदपत्राची पहाणी केली असता, वस्तुसूचीमध्ये (inventory list) अपिलकाराच्या नावाचा समावेश नसल्याचे आढळून आल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास कळविले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, सदर प्रकरणी पात्र झोपडीधारकाच्या यादीमध्ये अपिलकाराच्या नावाचा समावेश करण्याची मुख्य बाब असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने पात्र झोपडपट्टीधारकाच्या नावाच्या यादीत त्यांचे नावाचा समावेश करुन घेण्याकरिता सक्षम प्राधिकरणाकडे संपर्क साधवा.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-३१/१०/२००८.**